

B.V. 5436
M. J. Arts Science & Commerce College LIBRARY JALGAON



# आजिंठा

151

नियतकालिक

वर्ष २४ वे ● अंक २४ वा

: : मार्च १९७० : :

: विद्यार्थी प्रतिनिधी :
श्री. श्रीधर चौधरी
प्रथम वर्ष–विज्ञान

: मुख्य संपादक :
प्रा. रा. वा. पाटील

B.V. 5436

मूलजी जेठा महाविद्यालय, जळगांव

## संपादक मंडळ

आचार्य या. शि. महाजन
प्रा. म. ना. अदवंत
प्रा. मो. ह. भावे
प्रा. शं. र. पुणतांबेकर
प्रा. ज. वि. महाजन
प्रा. सौ. मंगला नाडकर्णी
प्रा. डी. एस. नेमाडे
प्रा. श्यामकान्त कुलकर्णी
प्रा. इफ्तिकार अहमद
प्रा. रा. धा पाटील
श्री. श्रीधर चौधरी ( विद्यार्थी प्रतिनिधी )

## अनुक्रमणिका



| | | |
|---|---|---|
| संपादकीय | ... | १ ते ६ |
| मराठी विभाग | ... | १ ते ५८ |
| हिन्दी विभाग | ... | १ ते २४ |
| संस्कृत विभाग | ... | १ ते ४ |
| इंग्रजी विभाग | ... | १ ते १० |
| अहवाल इंग्रजी | ... | १ ते ८ |
| " मराठी | ... | १ ते ८ |
| उर्दू विभाग | ... | १ ते ६ |


आमचे प्राचार्य—

## हार्दिक अभिनंदन



पुणे विद्यापीठाच्या कार्यकारिणीवर फेरनिवड,
पुणे विद्यापीठाच्या समाजशास्त्र ह्या विद्याशाखेतील अर्थशास्त्र ह्या
अभ्यासमंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती
व
अखिल भारतीय नभोवाणीच्या सल्लागार समिती वर ( महाराष्ट्र राज्य ) नियुक्ती



Gymkhana Managing Committee
1969-70

# संपादकीय-


**पुण्स्मरण: —**

खासदार शिवराम रंगो उर्फ काकासाहेब राणे ह्यांचे आकस्मिक निधन ही आमच्या सर्वांच्या दृष्टीने अत्यंत दुःखद घटना होय. त्यांच्या निधनाने एक सुसंस्कृत, शालीन व समतोल जीवन अस्तंगत झाले. जळगाव जिल्ह्याच्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक जीवनाची सुसंबद्ध घडण करणाऱ्या मूठभर शिल्पकारात काकासाहेबांचे अग्रगण्य स्थान होते. वकिलीत त्यांनी उत्तम प्रतिष्ठा मिळविली होती. आपल्या प्रेमळ व निगर्वी स्वभावाने त्यांनी सर्वांची मने जिंकली होती. लहान असो, थोर असो, गरीब असो, श्रीमंत असो, कुठल्याही जातीधर्माचा असो, काकासाहेब सर्वांना 'आत्मीय' वाटत.

काकासाहेब राणे १९४६ ते १९५२ च्या काळात तेव्हाच्या मुंबई विधान सभेचे सदस्य होते. नंतर ते लोक-सभेवर निवडून गेले. लोकसभा काँग्रेस पक्षाचे उपमुख्य प्रतोद म्हणूनही त्यांनी काम केले होते. खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीच्या, सुरुवातीच्या काळी त्यांनी चिटणीस म्हणून काम पाहिले. मूळजी जेठा कॉलेजच्या स्थापने पासून सतत २५ वर्षे ते मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य होते. मॉडर्न हायस्कूल व वुईमेन ट्रेनिंग कॉलेज चालविणाऱ्या 'शिक्षण मंदिर' जळगाव व 'तापी व्हॅली एज्युकेशन सोसायटी' फैजपूर ह्या संस्थांच्या अध्यक्षपदाची धुराही त्यांनी सांभाळली.हरिजन कन्या छात्रालय ह्या संस्थेचेही ते अध्यक्ष होते. १९४७ ते १९५१ च्या काळात 'राष्ट्रसेवक' पत्राचे ते संपादक होते. खानदेश शिक्षण मंडळ, अमळनेर, ह्या संस्थेचे ते फेलो होते. तसेच काँग्रेस फार्मर्स पार्लमेंटरी फोरमचे उपाध्यक्ष या नात्यानेही त्यांनी काम पाहिले होते. जिल्ह्यांतील तापी धरण योजना साकार व्हावी, जिल्ह्यातील केळीचे उत्पादन वाढावे, रेल्वे वाहतुक सोयीची व्हावी ह्या अनेक दृष्टींनी केलेले त्यांचे कार्य संस्मरणीय होय. त्यांच्या निधनाने एक नैष्ठिक, तपस्वी व लोभस व्यक्तिमत्व कायमचे अंतर्धान पावले.

२१ फेब्रुवारी रोजी पुणे विद्यापीठाचे कुलगुरु श्री. हरिभाऊ पाटसकर ह्यांचे ते आपल्या कचेरीत काम करीत असतानाच प्राणोत्क्रमण झाले. त्यांच्या निधनाने जुन्या पिढीतील एक कष्टाळू व सत्प्रवृत्त देशभक्त कायमचा हरपला.

१९२० साली हरिभाऊ महात्माजींच्या राजकारणाने प्रभावित होऊन काँग्रेसमध्ये आले. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात ते नेहमीच अग्रभागी राहिले. १९३७ ते १९४५



स्नेह-सम्मेलन व्यवस्थापक समिती १९६९-७०



# वळणावरून परत—

—रजनी नारायण पाटील
T. Y. B. A.

फ्लॅटचे दार उघडून निलिमा बाहेर पडली. ते पुन्हा लावून घ्यावयाचेही तिला भान नव्हते. १०-२५ ची लोकल सापडायला हवी होती. फक्त पाचच मिनिटे होती. स्टेशनवर जायला ! त्यातच कहर म्हणजे सकाळी पावसाचा शिडकावा होऊन गेल्याने रस्त्यावर सर्वत्र चिखल झाला होता. त्यामुळे साडी जरा वर धरून चालावे लागे. ती जाडजूड पुस्तके, पर्स व पुन्हा साडी या साऱ्यांना सावरता सावरता फक्त ५ मिनिटांत लोकल गाठायची. निलिमा चरफडतच भराभर चालत होती.

स्टेशनात लोकल उभीच होती. तिने प्लॅटफॉर्म चढायला सुरुवात केली आणि तितक्यात लोकल निघायची वेळ झाली. तशीच पळत ती एका डब्या-जवळ आली. तो पुरुषांचा डबा होता. स्त्रियांचा डबा त्यापासून दोन डबे पुढे होता. मैत्रीणींच्या हाकेलाही न जुमानता निलिमा त्या पुरुषांच्या डब्यात चढली. सुदैवाने एक सीट रिकामी होती. निलिमा तेथे जाऊन बसली. पळत पळत आल्याने घामाच्या धारा वहात होत्या. दमही इतका लागला होता की तिचा श्वासोच्छ्वास अजूनही जोरातच चालू होता. निलिमाचे लक्ष आजू-बाजूच्या पुरुषांकडे गेले. साऱ्यांचे लक्ष तिच्याकडेच वेधलेले होते हे पहाताच ती चपापली व सावरून बसली.

खिडकीतून दूरवर मनोहर दृश्य दिसत होते. धुसर डोंगर न्हाऊन निघाले होते. झाडांची पाने चकाकत होती. आकाश अगदी निळेभोर होते. त्याच्याकडे पाहून कोणाला खरेसुद्धा वाटणार नाही की, सकाळी जोरात पाऊस पडून गेला म्हणून ! केव्हा काळे ढग आपले साम्राज्य पसरवतील काही सांगता येत नाही. क्षणात ऊन तर क्षणात सावली ! आकाशही क्षणात काळे तर क्षणात निळे ! पावसाळ्यातच हे कसे होते ? कोणी बरे शिकविले असेल त्यांना ? काय गंमत असते नाही ! वास्तविक साधी कल्पना ! हे असे का होते हेही आपल्याला माहित असते. परंतु त्या प्रश्नांची उत्तरे न देता फक्त प्रश्न विचारीत रहाण्यातही काही गंमत असते. निलिमाला आपल्या या विचारांचे हसूच आले.

वारा जोरात वहात होता. तिचे लक्ष खिडकी-शेजारी बसलेल्या तरुणाकडे गेले. त्याचे केस वाऱ्याने उडत होते. केसांची ती झुलपे उडतानाही काय सुरेख दिसत होती ! तरुण ही रुबाबदारच होता. त्याचे भव्य कपाळ, लांब नासिका, नाजूक ओठ, साधारण पण टापटीप पोशाख ! सारेच कसे पहातच रहावे असे. अगदी एका नजरेत निलिमाने हे सारे टिपले. त्याचेही लक्ष निलिमाकडेच होते. दोघांची नजरानजर होताच तिला कसेसेच झाले. तिचे लक्ष त्याच्या हँडबॅगकडे गेले. त्या बॅगवर त्याचे नाव असावं. निलिमाने ते वाचण्याची धडपड केली. डोळे ताणताणून पाहिले. परंतु ते स्पष्ट दिसलेच नाही. दादर येताच तो उठला. त्याची हँडबॅग नेमकी निलिमा बसली होती त्या बाजूच्याच हातात असल्याने नाव वाचण्याच्या तिच्या धडपडीला यश आले. त्यावर " उन्मेष साठे, दादर " एवढेच लिहिले होते. निलिमाच्या मनात काहीशी चलबिचल झाली. ' उन्मेष साठे ' कोठे बरे हे नाव आपण ऐकले असावे ? तिने आपल्या बुद्धीला ताण दिला. आठवणींचा कप्पा उघडला. परंतु काहीच उपयोग झाला नाही. बुद्धीला जास्त ताण दिला म्हणजे माहित असूनही ते आपल्याला आठवत नाही.

उन्मेष साठे...... उन्मेष साठे...... उन्मेष साठे.

ही अक्षरे तिच्या डोक्यात गरगर फिरायला लागली. हो ! नक्कीच ! हे नाव आपण कोठे तरी ऐकले आहे. पण कोठे ? ते मात्र काही केल्या आठवेना.

विचारांच्या तंद्रीत वेळ कसा गेला हे कळलेच नाही. तिचे स्टेशन आले. ती खाली उतरताच तिच्या मैत्रीणी धावतच आल्या.

" ए निमे ! आज आमच्या बरोबर यायचे नव्हते वाटत ?"

" हो ना ! आज लेडीज मधे न चढता जेन्टस् मधे चढलीस तर."

'जेन्टस्' वर भर देत लता म्हणाली.

" लते ! अग तिचा 'तो' भेटला असणार !"

" निमा, आम्हाला मात्र विसरू नकोस हं !" स्वाती खवचटपणे म्हणाली. निलिमाला हसूच आले. अशा हास्यविनोदाने त्या कॉलेजमध्ये पोचल्या तास सुरु झाला. पण निलिमाचे लक्ष लागेना. तिची विचारतंद्री पुन्हा सुरु झाली. 'उन्मेष साठे' कोठे हे नाव आपण ऐकले आहे बरे ? तिला पुन्हा तो तरुण आठवला. त्याचे ते भुरभुरणारे काळे भोर, दाट केस, भव्य कपाळ, लांब नासिका ! काय योगायोगाच्या गोष्टी असतात पहा ! थोडा उशीर झाला म्हणूनजेन्टस्-डब्यात चढावे लागले. आणि त्या डब्यात चढलो म्हणून तो तरुण दिसला व त्याचे तावही !

तास संपल्यानंतर साऱ्या मैत्रीणी चिंचेच्या झाडाखाली जमल्या. " लते ! आज अशी बातमी सांग की सगळ्यांच्या कळ्या खुलल्या पाहिजेत." निमाकडे पहात स्वाती म्हणाली.

लता म्हणजे त्या कंपूतले चालते बोलते वर्तमानच ! "नासबगांवच्या खुनाची का क्रिकेट मॅचची सांगू ?"

" क्रिकेट मॅचची सांग" म्हणून सगळ्यांनी एकच गिल्ला केला.

" मग ऐका हं !" मैत्रीणींची अधीरता जाणून तितक्याच थंडपणाने लताने सुरुवात केली,

" उद्यापासून क्रिकेट मॅच सुरू आहे."

" हो का ! आणि कोठे ग ?" पुन्हा साऱ्यांचा ओरडा.

" अग ब्रेबॉर्न स्टेडियमवर आणि कर्णधार कोण ते माहीत आहे का ?"

" कोण ग ?"

" उन्मेष साठे !"



निलिमाने आश्चर्य करीत पुन्हा " उन्मेष साठे" नाव उच्चारले. स्वातीने ते ओळखले " निमा, तुला एवढे काय ग आश्चर्य वाटले ? गेल्या वर्षी त्याने शिवाजी मैदान किती दणाणून सोडले होते. जसे काही तुला माहीतच नाही !"

" तोच का हा उन्मेष साठे ?"

" हो, मग !"

निलिमाच्या डोक्यात आत्ता प्रकाश पडला. सकाळपासून आपण जे आठवीत होतो ते आता आठवले. पुन्हा तिला सकाळची सुखद आठवण झाली.

" ए, काय छान खेळतो तो !"

" गेल्या वर्षी १४० धावा काढूनही तो नाबाद राहीला होता."

" आणि कथाही काय सुरेख लिहितो. त्याच्या " बकुळी" या कथेला पहिले बक्षीस मिळाले आहे."

निमा सारे ऐकत होती. पुन्हा कधी तो भेटेल का ? हा एकच प्रश्न तिला सतावीत होता स्वातीने तिला चिमटा काढीत म्हटले,

" निमा, उद्या येशील ना मग मॅच पहायला ?"

" अगदी जरूर !" निलिमा पटकन म्हणाली.

—×—

मल्या पहाटेसच निलिमाकडे इंदुरची तिची मावशी बऱ्याच दिवसांनी आली होती. १० वाजता मॅच होती. पण मावशी आल्याने निमाला जाता आले नाही. अर्थात मावशीनेच जाऊ दिले नाही. त्याला पहाण्याचा एक चान्स हुकला म्हणून तिच्या मनाला रुखरुख लागून राहिली.

अचानक एके दिवशी निलिमाला तो रस्त्याने जाताना दिसला. दोघांची नजरानजर झाली. निमाने ओळखीसाठी स्मित केले त्यानेही ओळखून त्याला प्रत्युत्तर दिले. तो जवळ आला. निमाने त्याला विचारले.

" ओळखलत का ?"

" वा ! न ओळखायला काय झाल ? पुन्हा कधी आपली भेट होण्याची आशा नव्हती."



" पण झालीच ना !" निमाने हसून विचारले.

" अहो ! भेट व्हायलाही भाग्य लागत. बरं ते असू द्या. तुम्हाला जरा वेळ असल्यास त्या पार्कमध्ये बसू ?"

" हो ! हो ! चालेल की"

रस्त्याने जाताना निलिमाला त्याचा तो सुखद स्पर्श अधिकच धुंद करीत होता तो सारखा बोलत होता. पार्कच्या कोपऱ्यात बसल्यावरही निमाचे बोलण्यात लक्षच नव्हते. ती सारखे त्याला न्याहाळीत होती व हृदयात साठवीत होती.

" तुम्हाला माझे बोलणे आवडत नाही का ?" न राहवून तोच म्हणाला.

" असे कुठे मी म्हटले ?" न कळत ती उद्गारली.

" मग तुम्ही अशा गप्प का ?"

" हे पहा ! अति आनंद झाला म्हणजे तोंडातून शब्दच फुटेनासे होतात."

" म्हणजे तुम्हाला आनंद झालाय तर !"

" तुम्हाला नाही वाटत ?"

" माणसाच्या तोंडावरून त्याच्या मनातील ओळखता येण्याइतका मी बुद्धिमान नाही."

" ओ ! हो ! एवढे लेखक आहात ना ! कथेत असेच नाही तुम्ही लिहित !"

" कोण ? मी ? तशा मी कथा फारच थोड्या लिहितो म्हणा !"

" पण मला आवडतात."

" चला निघू या. फार उशीर झाला. आई वाट पहात असेल."

दोघही उठले व चालू लागले.

" पुन्हा भेट होईल अशी अपेक्षा आम्ही बाळगावी का ?"

तिच्याकडे पहात त्याने म्हटले.

" न व्हायला काय झाले" त्याच्या डोळ्यात निरखीत ती म्हणाली.

" कधी ?"



" तुम्ही म्हणाल तेव्हा !"

" मग उद्या संध्याकाळी भेटाल का ?"

" चालेल."

तो निघून गेला. निलिमा त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहातच राहिली. त्याची ती रुबाबदार चाल, शरीराचा सुदृढ बांधा, बोलके डोळे ! !

तिला तो स्पर्श आठवला. सुखद स्पर्श, धुंद करणारा स्पर्श, वेड लावणारा स्पर्श ! नकळत तिने आपल्या हाताचे चुंबन घेतले.

त्यांच्या भेटी रोज होत होत्या. कधी कधी इराण्याच्या हॉटेलात कोपऱ्यातल्या बाकावर बसून तर चौपाटीच्या खाऱ्या वाऱ्यात त्यांच्या गोड गोड, गुलाबी गुलाबी, गप्पा रंगत. त्यांच्या प्रत्येक भेटीत निलिमा खुलावत होती. परंतु तो... त्याला कळेना की ही नेहमी मला क्रिकेटीयर, लेखक काय नी कवि काय संबोधते. त्याचे कौतुक काय करते; नाव सांगतानाही तसेच !

" आपले नाव निलिमा न ?"

" हो ! अन् आपले नाव उन्मेष न !

" हो"

बस्स या उपर तिने कधी चौकशीच केली नाही. त्याला सारखे वाटे, की तिचा काही गैरसमज झाला आहे ? या गैरसमजाने अनेकांच्या आशांचे बळी घेतलेत. एकदा का गैरसमज झाला की त्याचा निरसा समज व्हायला बराचसा काळ लोटावा लागतो. ते सहवासहजी शक्य नसते.

एका रविवारी ती स्वतःच त्याच्याकडे गेली. एका चाळीत तो रहात होता. त्याने सांगितले होते की डाव्या हाताने वळून कॉर्नरवर एक जिना आहे तो चढल्यावर उजव्याच बाजूला पहिलाच ब्लॉक त्याचा आहे. निलिमाने शब्द पुन्हा पुन्हा घोकले. ती जिन्याने वर आली व उजवीकडे वळली. न जाणो घर चुकायचे म्हणून आधी विचारून घ्यावे ह्या हेतूने ती त्या ब्लॉकमध्ये डोकावली. आत एका खाटेवर आजारी स्त्री होती. व तिच्या जवळ ८-१० वर्षांची मुलगी खेळत होती. तिने त्या स्त्रीला विचारले, "उन्मेष साठे कोठे रहातात ?"

चटकन ती मुलगी पुढे येऊन म्हणाली, " उन्मेष साठे ? म्हणजे तुम्हाला दादाचा मित्र हवाय ! तो येथे रहात नाही. "

तिचे बोलणे संपायच्या आतच तो आतल्या खोलीतून बाहेर आला.

" ओ हो ! तुम्ही ? तरीच म्हटल आवाज कसा ओळखीचा वाटतोय ! आज अचानक कशी काय पायधूळ झाडलीत ? "

" अचानक ना ! मुद्दामच आले. पण हो रे काय म्हणत होती उन्मेष साठे येथे रहात नाही ! "

" म्हणजे ? तुला कोण पाहिजे होत ? "

" अर्थात तूच ! उन्मेष साठेच पाहीजे होता म्हटल ! "

" मी आणि उन्मेष साठेही ? " त्याने आश्चर्य व्यक्त करीत विचारले.

" दोन नव्हे. दोन एकच असलेली व्यक्ती ! "

" हो ! पण माझ नाव..." तो अडखळला. कारण त्याला आताच सारे सांगणेही शक्य नव्हते व निमाला एकदम नाराज करणेही शक्य नव्हते. विषय बदलण्याच्या हेतूने तो म्हणाला, " बर. ते असू दे. चहा घेणार की सरबत ! आज माझ्या हातचे घेऊन बघ ! " तो स्वयंपाकघरात गेला. त्याच्या पाठोपाठ निलिमाही आत गेली. व त्याच्या हातची आगपेटी घेत म्हणाली, " मग आज माझ्याच हातचा चहा घेऊन बघा. "

" हो ! पण आईला आवडणार नाही. कोणी पाहुण आले तर त्यांनाच आपण चहा करायला सांगू का ?"

" पाहुणीच का ? " नकळता निलिमाचा स्वर कातर झाला.

" अग ! अजून तरी आईच्या दृष्टीने ! "

" हो ! आणि मैत्रिणी आल्या असता एवढ्या मोठ्या लेकाने स्वयंपाकघरात चहा करीत बसण हे आवडेल का ? "

" ते ही खरच पण इलाज नसतो. "

निलिमाने चहा करून सर्वांना दिला. सार्‍यांनी तिची स्तुती केली. निमाने चहाची भांडी, कपबशा व्यवस्थित लावले. त्याच्या आईची व बहिणीची विचारपूस केली.

" चला, आपण बाहेर जाऊन येऊ " तो म्हणाला. दोघेही बाहेर पडलीत. रस्त्याने जाताना त्याने तिला विचारले.

" तू मला उन्मेष साठे म्हणालीस ना ? "

" हो, म्हणजे तुझ नाव उन्मेष साठे नाही ? "

" नाही. माझ नाव उन्मेष साठे नाही तर उन्मेष दमले आहे. "

" पण त्या दिवशी तुमच्या बॅगवर उन्मेष साठे तर लिहिले होते ! "

" तो माझा एक जिवलग मित्र आहे. एके दिवशी तो माझ्याकडे आला व त्याची बॅग विसरून गेला. ती बॅग मी त्याला पोहोचवून दिली. पण त्या बॅगेवरच्या नावाने इतका घोटाळा होईल अशी माझी कल्पना नव्हती "

" म्हणजे तुमचा तो मित्र आहे तर ! " निलिमा पुटपुटली.

" हो ! तो माझा मित्र आहे. अगदी जिवलग ! आम्ही अगदी सख्ख्या भावाप्रमाणे आहोत. लहानपणा - पासून एकाच वर्गात होतो, तो अगदी B. Com. पर्यंत. नावातही आमचा सारखेपणाच आहे. B. Com. ला आम्ही फर्स्टक्लास आलो. पण अचानक त्याच वर्षी माझे वडील वारले. एकदम इतके दिवस डोक्यावर धरलेले छत्रच कोसळले. किती किती आशा बाळगल्या होत्या. पण सार्‍यांचा चुराडा झाला.. मग मी नोकरी धरली. तो मात्र पुढे M. Com. झाला. व रिझर्व्ह बँकेत लागला. लहानपणापासूनच आम्ही क्रिकेट खेळत असू पण पुढे मला वेळ मिळेना ! आई सारखी आजारी असते. तिचे औषधपाणी, लहान बहीण तिचे शिक्षण, लग्न सारेच अजून राहिले आहे. एवढा पैसा मी एकटा कसा पुरवणार. त्यासाठी मग मला ओव्हरटाईमवर काम करावे लागते. त्यातुळे मला कधीलाच म्हणून वेळ मिळत नाही. ना क्रिकेट ! ना कथा ! ना कादंबऱ्या ! तो मात्र लखी-घरचा खूप श्रीमंत. पुन्हा हुशार. तुम्ही उन्मेष साठे नावाच्या व्यक्ति- वरच प्रेम केलेत ना ? "



निलिमा गप्पच होती तिला काहीच सुचेना. एका नावामुळे केवढा घोटाळा झाला होता. तोच पुढे म्हणाला, " चला ! मी तुम्हाला, तुम्ही ज्याच्यावर प्रेम केलत त्या उन्मेष साठेकडे नेतो तुम्ही नाही म्हणू नका. मला माझ्या मित्रासाठी एवढा त्याग करायलाच हवा. तो सुंदर आहे, देखणा आहे, श्रीमंत आहे, शिकलेला आहे. नावाजलेला आहे. कीर्तीवान माणूस कोणाला नकोसा असतो. आणि तुमच्यासारखी पत्नी मिळाल्यास कोणाला आनंद होणार नाही ? मला त्याच्या आवडी-निवडी सर्व माहीत आहेत. तुमच्यासारखी सुशील, सुंदर, संपन्न पत्नी मिळाल्यास तो नाही म्हणणार नाही. "

नकळत निलिमाही त्या रस्त्याकडे वळली. पण तिच्या डोक्यात विचारांचे काहूर माजले होते. हा पाहिजे की तो ? प्रत्येक क्षण मोलाचा होता. फक्त दहाच पावलांवर असलेला तो गुलाबी बंगला त्याचा आहे असे उन्मेष बोट दाखवून सांगत होता. फक्त दहाच पावले ! एकदाचे त्या बंगल्यावर गेल्यावर आपण या उन्मेषचे रहाणार नाही. त्याला किती वाईट वाटेल ! ज्या ज्योतीवर सर्वस्वी जीव ओवाळावा, प्राण पणाला लावून प्रेम करावे तिनेच अखेर त्या पतंगाला, प्रेमवेड्याला जाळून टाकावे ना ? नाही, नाही असे होणार नाही ! या उन्मेषशी मी प्रतारणा करू शकणार नाही ! नावात विशेष काय असते ! व्यक्तिवरच सारे अवलंबून. ज्याच्याशी प्रीतीचे लंपडाव खेळलो त्याला दूर सारून ज्याला कधी पाहिलेही नाही त्यावर जीव ओवाळणे तिला अप्रशस्त, कसेलेच वाटले. तिच्या मनाला ते पटेना.

" नाही, उन्मेष नाही ! हा रस्ता माझा नाही ! ही पाऊलवाट माझ्यासाठी नाही ! या हिरवळीत माझा जीव गुदमरेल. हा गुलाबी बंगला मला खायला उठेल. उन्मेष मला तो उन्मेष नको. मला फक्त तुम्हीच हवेत ! फक्त तुम्हीच ! ! "

निलिमाने त्याचा हात धरीत आवेगाने म्हटले. तिच्या डोळ्यात अश्रू दाटले होते. ते अश्रू पुसत उन्मेष म्हणाला, " पण मागाहून पश्चात्ताप करशील निमा."

" उन्मेष ! ईश्वराची पूजा करणारा भक्त ईश्वराला ती हवी की नको याचा विचार करीत नाही. पूजेसाठी ओंजळीत घेतलेली फुले निष्कलंक, टवटवीत आणि दवबिंदूंनी नुकतीच न्हाऊन निघालेली असली म्हणजे झाले ! उन्मेष तुम्ही स्वीकार करणार नाही का माझ्या या प्रीतीफुलांचा ? सांगा, उन्मेष सांगा ! ! नाहीतर माझी वाट आणखी तिसरीकडेच एकटीच जाईन. मग मला कोणी नको. या जगात आली तशीच निघून जाईन. उन्मेश, माझ्या या प्रीती–फुलांना चुरगाळू नका. "

निलिमाने रडतच त्याच्या छातीवर डोके टेकले. तिची हनुवटी हाताने अलगद वर उचलीत उन्मेष म्हणाला.

" बस्स ! रडूबाई, मग चलायचं परत ? "

" हो ! लगेच ! "

निलिमाच्या डोळ्यात आनंदाश्रू चमकू लागले. तिला खूप समाधान वाटले. स्वर ताणून ताणून एकदम सोडून द्यावे त्याचप्रमाणे मन अगदी हलके झाले. दोघे जण परतीच्या वाटेला लागले. त्या वाटेने पुढे जाऊन एक वळण घेतले की उन्मेष साठेचा बंगला येणार होता. पण... पण आता त्या वळणाशी न जाताच ती परत फिरली होती. तिला खरी वाट सापडली होती. तिच्या मनात एक विचार चमकून गेला, हे वळण आपण ओलांडले असते तर...? तिचे मन शहारलेच. पण क्षणभर... आपण त्या वळणाच्या पुढे न जाता लगेच सावरलो याबद्दल तिला खूप खूप समाधान वाटत होत. जाताना हीच वाट संशय, दुःख यांच्या काट्यांनी भरलेली होती. तीच आता समाधान, आनंद, प्रेम यांच्या फुलांनी डवरली गेली. दोघांचे हात एकमेकात गुंफले होते. तोच कुठून तरी गाण्याची लकेर ऐकू लागली.

" तेरे मेरे सपने अब एक रंग है..."

निलिमाने उन्मेषकडे स्नेहार्द्र दृष्टीने पाहीले. उन्मेष तिच्याकडेच बघत होता. दोघांची नजरानजर झाली. गालावर गोड स्मित उमटले. आणि निलिमाचे डोळे नकळत खाली वळले.

# उजळली भावभक्तीची ज्योत !

—विजय अ. नाईक
T. Y. B. A.

दीपक आरामखुर्चीवर पहुडला होता. त्याने आपली खोली बंद केली होती. हातात सिगारेट होती. सिगारेटच्या निघणाऱ्या धुम्रवलयांकडे तो विषण्ण नजरेने बघत होता. धुरांची वलये निरनिराळ्या आकारात निघत आणि हवेत विलीन होत होती. बाहेर आकाशात चंद्रमा वर आला होता. त्याच्या शुभ्र प्रकाशाने सारी पृथ्वी न्हाली होती. सर्व शांत शांत होत. चंद्राच्या मंगलप्रकाशाला मध्येच एखादा काळा मेघ बाध आणु पहात होता. काळा मेघच तो ! त्याला चंद्राच्या मंगलेतची काय कल्पना ! पण, मंगल्ता ती मंगल्ताच ! ती थोडीच काळ्या मेघाला जुमानते; ती त्यावर मात करणारच ! चंद्राच्या मंगल्तेपुढे काळा मेघ फिका पडायचाच आणि मंगल्ता मंगल्तेनेच पुढे यायची. दीपक चंद्र आणि काळा मेघ यांचा लपंडाव पहात होता. सिगारेटचा धूर निघत होता. त्या धुराबरोबरच दीपकचे विचारही त्याच्या डोक्यातून निघत होते. जगात मंगल असे काहीच नाही का ? निष्पाप असे काहीच नाही का ? का जगात थारा आहे तो अमंगल, पाप, अनीती यांनाच ? नीती आणि अनीती यांच्या शर्यतीत नेहमी अनीती आपल्या प्राबल्याने नीतीला हरवीणार का ? पण, अनीतीला नीतीचे सामर्थ्य एक दिवस कळल्याशिवाय राहणार नाही. अमंगल्तेवर मंगलता मात केल्याशिवाय राहणार नाही, पापावर निष्पापता विजय मिळविल्याशिवाय राहणार नाही. दीपकने आपली सिगारेट पायाखाली दाबली आणि विचार करीतच त्याचा डोळा लागला......!

अण्णा सकाळी सूर्याला अर्घ्य देत होते. दीपक वर्तमानपत्र वाचत होता. वाचत होता म्हणण्यापेक्षा कुठे काही जाहिरात सापडते का, ह्याचा शोध घेत होता. असा नित्यक्रम गेले दिडवर्ष झाले चालू होता. बी. कॉम् होऊनही त्याला काम मिळत नव्हते. निरनिराळ्या ठिकाणी अर्ज करावे. मुलाखती याव्यात आणि शेवटी वशिला नसल्याने निराशा पदरी यावी हे त्याच्या अंगवळणी पडल होत. पेपर वाचता वाचता त्याची नजर त्या जाहिरातीवर खिळली. मुंबईच्या "रामानंद फार्मसी" ह्या औषधी कारखान्याला अकाउंटन्टची आवश्यकता होती. अर्जासह समक्ष भेटा असे म्हटले होते. दीपकलाही पुन्हा आपल्या नशीबाची परीक्षा पहावीशी वाटली. आणि दिपक आपल्या प्रशस्तिपत्रक व अर्जासह दुसऱ्याच दिवशी मुंबईत येऊन दाखल झाला.

मुलाखत सुरू होती. दीपकच्या आधीचे पाच नंबर झाले. 'दीपक कुळकर्णी' त्याच्या नावाने पुकारा झाला. त्यासरशी दीपक धडधडत्या अंतःकरणाने आत गेला. मुलाखत घेण्यासाठी तीनचार लोक बसले होते. आणि त्यांना योग्य वाटणाऱ्या उमेदवारांचे अर्ज आत असलेल्या मालकाकडे पाठविले जात होते. दीपकचा अर्ज पाहून सर्वानुमते तो आत पाठविला गेला. आणि दीपक मुलाखत संपली म्हणून हॉलच्या बाहेर जायला लागला. त्याची पाठ वळली तोच शिपायाने त्याला मालकाने बोलावले म्हणून सांगितल. दीपक आश्चर्यचकीत होऊन आत गेला तो त्याचा डोळ्यावर विश्वासच बसेना. आपण स्वप्नात तर नाही ना, म्हणून त्याने स्वतःला चिमटी घेतली. रामाकाका 'दिपू दिपू' म्हणून जवळ बोलवीत होते. तो अगदी मांबावून गेला. क्षणभर तो भूतकाळात गेला. 'रामाकाका' अण्णांचे मित्र ! सीमाक्का ! लहानपणी एकत्र खेळलो, नाचलो ! वत्सलाकाकू ! आणि एवढ्या मोठ्या फर्मचे मालक !' इतक्यात रामाकाकाच त्याच्याकडे आले. "कारे दिपू एवढा भांबावलास, अरे मी रामाकाकाच" म्हणून त्यांनी एकदम मायेने त्याला जवळ ओढल. दिपूने रामाकाकांना नमस्कार केला. अण्णाविषयी आणि त्याच्याविषयी रामाकाकांनी विचारपूस केली. आणि त्याला येण्याच बजावल आणि नौकराकरवी अण्णांना दिपूला नौकरी मिळाली म्हणून तार केली.

दुपारी दिपूभैय्या येणार ही बातमी कळताच सीमाला कोण आनंद झाला. तिच्या डोळ्यासमोर हाफ



पॅन्ट आणि शर्ट घेतलेला दिपू तरळायला लागला. बालपणीच त्याच्यासमवेतल खेळण, हसण, बाचण, फुरगटण तिला आटवल. त्यावेळचे सर्व प्रसंग डोळ्यासमोरून सरकायला लागले. तिला एकदम आठवण झाली. अरे हो, दिपूभैय्या इतक्या दिवसांनी भेटणार मग त्याच्या आवडीचा पदार्थ नको का करायला, आणि तिने एकदम निर्णय घेतला. स्वतः सर्व तयार करून दिपूभैय्याची वाट पहात सोफ्यावर बसली. मधूनच उठून खिडकीपर्यन्त यायची, रस्त्यावर दूरवर नजर टाकायची. चार वाजले, साडेचार वाजल, पाच झाले. दिपूभैय्याचा पत्ता नाही. "ह्याची लोकांना सतावायची सवय गेलली दिसत नाही अजून; थांब येऊच दे त्याला, बोलणारच नाही त्याच्याशी. अगदी गट्टी फूंऽऽ" इतक्यात दारावरची बेल वाजली म्हणून सीमा धावतच दार उघडायला गेली. दार उघडते तो दारात उंचपुरा, गोरा-गोमटा तरुण उभा दोघे एकमेकांकडे डोळे विस्फारून बघू लागले. दिपूने एकदम म्हटले 'सीमाक्का', 'दिपूभैय्या' सीमा उद्गारली 'तु अक्का, आणि एवढी मोठी झालीस, अरे बापरे आणि तो काही दिसत नाही !' दिपूने सीमाच्या चेहऱ्याकडे पाहून म्हटल. 'तो कोण रे दिपूभैय्या !' "ओळख !" मला नाही ओळखायला येत. ये बाबा, असं आस्याभास्या कोडे घालू नकोस' 'अग, तो नेहमी नाकावर असायचा तो 'शेंबूड' 'शाब्बास दिपूभैय्या, तुला काय वाटल रे आपणच मोठ झालो आणि अक्का मात्र अजून तशीच फ्रॉकमधली, तुझ्याबरोबर मातीचा खोपा करताना मध्येच मनगटाने शेंबूड पुसणारी अँ. अहो साहेब आम्ही पण आता बी. ए. झालो, म्हटल' 'नुसती बी. ए. च मला वाटल. अक्कासाहेब कदाचीत आपल चंबूगबाळ आटोपून पळाल्या असतीलही' 'हो, एवढी जड झालीय नाही कारे भैय्या तुला ? म्हणून तर इतके वर्ष अक्काची इतकी चौकशी केलीस नाही का ?' 'बर ते जावू दे आता. मी एवढा लांबून तुझा शोध घेत आलो आणि तू साध बसही म्हणत नाहीस.' 'अरे हो विसरलेच की; आणि बर का भैय्या, तुझ्या आवडीचे अनारसेही केले आहेत हं. थांब हं आताच आणते." नंतर दिपू आणि सीमा अनारशांचा समाचार घेण्यात गुंग असताना सीमाने अण्णांची चौकशी केली. दिपूलाही वत्सलाकाकूंच्या अचानक मृत्यूची बातमी ऐकून हळहळ वाटली. नंतर दिपू रोज अक्काच्या भेटीला येण्याचे कबूल करून घरी आला.

चार पाच दिवसातच दीपक 'रामानंद फॉर्मसीच्या अकाउंटन्टपदी हजर झाला सर्वांची ओळख झाली. हेडक्लार्क जोशीने त्याला सर्व फर्म दाखवली. फर्मचे मॅनेजर शेखर दीक्षित औषधीच्या अभ्यासासाठी आणि निरनिराळ्या फर्मची पहाणी करण्यासाठी मालकातर्फे अमेरिकेला गेल्याचे समजले. दीपक आपले काम व्यवस्थित करू लागला. रोज तो अक्काला भेटायला जायचा. रामाकाकाही त्याला मुलाप्रमाणे माया लावायचे सीमाला आपला दिपूभैय्या बऱ्याच वर्षांनी भेटल्याने त्याला कुठे ठेवू, कुठे नको असे झाले होते. ते दोघे बहीण भाऊ रोज सायंकाळी फिरायला जायचे. गेल्या बऱ्याच दिवसांची कसरच ते जणु काढत होते. एकमेकांवर मायेची पखरण करत होते. एक दिवस असच दीपक आणि सीमा बसले होते. बोलबोलता सीमा आपण फर्म कशी काढली वगैरे माहिती देत होती. मध्येच दीपकने विचारले, "अक्का आपल्या फर्मचे मॅनेजर, 'शेखर दीक्षित' पटकन सीमा म्हणाली, 'बरेच हुषार आहेत म्हणे दीक्षित. आणि म्हणूनच रामाकाकांनी त्यांना स्वखर्चाने अमेरिकेला पाठवल म्हणतात. 'आणि लवकरच ते ह्या फर्मचे मालक नि तुझे मेहुणे होणार आहेत दीपक' मध्येच रामाकाकांनी दारातून म्हटल तेव्हा दोघांच्याही रामाकाका आल्याचे लक्षात आले. तसा दीपक सीमाला म्हणाला, 'आणि ह्या आमच्या बहिणाबाईंनी इतके दिवस झाले मला कस सांगितल नाही ते; म्हणजे ह्या फर्मच्या मालकीणबाई आणि शेखर मॅनेजर म्हणतील त्याला नंदीबैलासारखी मान हालवायला लावणार खर किनई !' 'दिपूभैय्या मी मारेन हं अस्याने' असं म्हणत सीमा त्याला मारायला धावली पण दिपू तिच्या हाती लागेना. क्षणभर दोघांचा हा शिवाशिवीचा खेळ चालला. अखेरी सीमाने त्याला सर्व हकीगत सांगितली. आपल्या भावी यजमानांचा फोटो दाखविला. त्यावेळी दीपक 'ओहो, काय दिसतय पण माकड' म्हणून चेष्टा करू लागला. म्हणून सीमा फुरगटली. तोच रामाकाका आले म्हणून सीमाने आपल पुराण आवरत घेतल.

दीपक आपल्या कामात ऑफिसची वेळ संपत आली असूनही मग्न होता. ऑफिसमधील इतर लोक आपआपले टेबल आवरत होते. इतक्यात सीमा आली आणि दिपूला त्याच काम टाकायला लावून जबरदस्तीने ऑफिसमधून घेऊन गेली. ते जाताच ऑफिसमधले इतर लोक कुजबुजायला लागले. जो तो ह्या विषयात आपले तारे तोडायला लागला. हेडक्लार्क जोशी नाकात तपकीर कोंबीत म्हणाले 'काय हो उपासनी, हा तर अगदी कानामागून आला आणि तिखट झाला म्हणायचा' 'अहो, तिखट कसला काय म्हणतात. मला तर वेगळीच शंका येते आहे.' असं म्हणून जोशींच्या कानाला तोंड लावले. त्या सरशी जोशीला ठिक आली आणि तिने उपासन्यांच्या म्हणण्याला पुष्टीच दिली. हा हा म्हणता ती ऑफिसमध्ये चर्चेचा विषय झाला.

एक दिवस दीपक रामाकाकांना कामाचं दाखवत होता. थोड्याच दिवसांनी इन्कमटॅक्सची तारीख होती म्हणून रामाकाक त्याला निरनिराळ्या सूचना करत होते. दिपू लक्ष देऊन कामातील खाचखळगे समजावून घेत होता. दोघांनाही वेळेचे भान नव्हते. सीमा दोघांची जेवणासाठी वाट पहात होती. अखेर बऱ्याच वेळाने रामाकाकांच्या लक्षात सीमाची चुळबुळ आली आणि ते दिपूला म्हणाले 'आता बराच वेळ झाला तेव्हा दोन घास खाऊन आजची रात्र इथेच रहा' सीमाने सहाजिकच वडीलांच्या म्हणण्याला दुजोरा दिला त्यामुळे दिपूला विरोध करण्यास जागाच नव्हती. जेवण झाल्यावर 'लिबर्टी'ला चांगला पिक्चर असल्याने दोघे गाडी घेऊन निघाले. गाडी थिएटरकडे वळताना ऑफिसच्या क्लार्कसच्या अंगावरून गेली. प्रत्येक जण 'आ' वासून गाडीकडे पहात होते. त्या दिवशी रात्री दोघांनी मनसोक्त गप्पा मारल्या. लवकरच शेखर परत येणार असल्याचे सीमाने सांगितल. ती दिपूला एकदम त्याच्या समोर उभे करून ओळख करून देणार होती.

सकाळी दिपू सर्व आटोपून बसला होता. इतक्यात ऑफीसचा प्यून कागदपत्र व किल्ल्या नेण्यासाठी घरी आला. रामाकाकांनी दिपूलाच ते देण्यास सांगितले म्हणून त्याने तिजोरी उघडून काढून दिले. प्यून आश्चर्यचकीत होऊनच परत ऑफिसाकडे फिरला. म्हणजे याचे तर अगदी मालकांच्या तिजोरीपर्यंत हात पोहचले वगैरे विचार घोळवत तो ऑफिसमध्ये आला. ऑफिसची वेळ होत आली तसतसे एक एक क्लर्क यायला लागले तशी बातमी फैलायला उशीर लागला नाही. मग चर्चेला ऊतच आला. "मी काय म्हणतो उपासनी, आता दीक्षित साहेबांना इथून गचांडी मिळणार असे वाटते. "अहो गचांडीच काय आता हा दीपकच आपला मालक आणि शेठजींचा जावई होणार असा रंग दिसतोय" दुसऱ्याने म्हटले ."काय बाकी जगात लोक आहेत कुणाच घर पाहवेल तर शपथ" म्हणून- तिसऱ्याने तोंड खुपसले चौथा काही बोलणार इतक्यात शेठजींच्या गाडीचा हॉर्न वाजला म्हणून सर्वजण आपआपल्या जागी जाऊन बसले. ऑफिस सुरू होऊन एक तास होत आला तरी दीपकचा पत्ता नव्हता. हेड क्लार्क तरफडत होता. इतक्यात दीपक आला सर्वांच्या नजरा त्याच्याकडे वळल्या पण हेडक्लार्क काही बोलणार तोच दीपक सरळ शेठजींच्या चेम्बरमध्ये गेला. उपासन्यांनी हेडक्लार्ककडे नुसत पाहिल ती नजर त्याला सांगत होती. बघा, उशीर झाला तरी सरळ शेठजींच्याकडे जाऊ शकतो. आणि तुम्हाला आठ वर्षे झाली तरी शेठजींच्या पुढे ब्र काढण्याची छाती होत नाही. ह्यामुळे जोशी रागाने लाल झाला. पण आपल्या खुर्चीत बसण्याशिवाय त्याला काही करता येत नव्हत. मध्येच कोणी हळूच म्हणाला "बिचारे दीक्षित साहेब ऽ ऽ"

अण्णांची तब्यत बरी नसल्याने दीपक घरी गेला होता. आणि त्याच आठवड्यात दीक्षित साहेब अमेरिकेहून येणार होते. सीमाची कोण धांदल उडाली होती. दोन वर्षांपूर्वी तिने त्याला अश्रूपूर्ण नजरेने निरोप दिला होता जपण्यास सांगितले होते. हा हा म्हणता दिवस निघून गेले होते. अखेर शेखर येण्याचा दिवस उगवला. रात्री दहा वाजता त्याचे विमान सांताक्रूझ विमानतळावर उतरणार होते. ती मुद्दाम शेखरने तिच्या वाढदिवशी अमेरिकेहून पाठवलेली साडी नेसली. रात्री साडेआठ पासूनच ती आणि रामाकाका विमानतळावर त्याला उतरविण्यास आले होते. सीमाला वाटत होते आज दिपूभैय्या असता तर बर झाल असत. अखेरी शेखर त्या विमानात सुखरूप आला होता. बऱ्याच दिवसांनी मिळालेल्या शेखरच्या सहवासात सीमा हरपून गेली होती. तिला स्वतःचे अस्तित्व असं काही शिल्लक नव्हत.





शेखर आल्याने त्याच्यावर सर्व जबाबदारी टाकून शेठजी विश्रांतीसाठी म्हणून सिमल्याला गेले होते. शेखर सर्व फर्मची पहाणी करत होता. सर्व व्यवस्थित आणि प्रगतीच्या पथावर असल्याच पाहून त्याला समाधान वाटल. हेडक्लार्कने त्याला सर्व कागदपत्र दाखवले. नवीन अकौंउन्टंट दीपक कुळकर्णी रजेवर असल्याचे सांगितले. त्याच्या मागे झालेल्या सर्व हालचालींची जातीने माहिती सांगितली. आणि त्याच्या दुसऱ्याच दिवशी दीपक हजर होणार होता. त्याच दिवशी शेखर हेडक्लार्क जवळ दीपक विषयी काही कागद देवून सीमासह दिल्लीला गेला. दीपक वेळेवर ऑफीसमध्ये आला. तो येताच त्याला जोशींनी बोलावून त्याच्या हातात मॅनेजर साहेबांनी हे तुम्हाला द्यायला सांगितल, म्हणून एक पाकीट दिल. दीपकने ते वाचताच त्याला धक्काच बसला. त्याला काहीच अर्थ लागत नव्हता. त्याच्या बेशिस्त वर्तनामुळे त्याला फर्म मधून कमी करण्यात आले होते. व फर्मच्या मालकाच्याच मुलीशी असभ्य वागणूक केल्याचा आरोप करण्यात आला होता. दीपकला सर्व ऑफिस आपल्याभोवती फिरत आहे असं वाटल. तो एका क्षणात घरी आला त्याला ऑफिसमध्ये कुणीही बोलण्याची संधी दिली नव्हती.

दीपकने स्वतःला खोलीत बंद करून घेतल होत. त्याला ह्या जगाशी संबंध नको असं वाटत होत. प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, माया सर्व भावनांनी त्याच्यावर बहिष्कार टाकला होता. त्याची विचारपूस कोणी केली नव्हती. सर्व जग त्याच्याकडे बोट दाखवत होते. तिकडे शेखरनेही त्याचा विषय घरात काढला नव्हता. एकदा सीमाने विचारल असताना त्याने टाळाटाळ केली होती. फर्मचा कारभार व्यवस्थित चालला होता. दीपकला ह्या विश्वात मिसळावस वाटत नव्हत. त्याची खोली त्याच विश्व बनल होत आणि विचार सोबती होते.

आणि एक दिवस विचार करून करून दीपक थकला होता. त्याचे डोळे नुकतेच लागले होते. दीपकला जाग आली ती घंटेच्या आवाजाने. आग ऽऽ आग ऽऽ लोक ओरडत धावत होते. रामानंद फार्मसीला आग लागली होती दीपकही गर्दी बरोबर धावत गेला. आग बरीच मोठी होती. गर्दीतून सीमा आक्रोश मोठ्याने ऐकू येत होता. मॅनेजर साहेब आगीत अडकले होते. आगीच्या भयानक स्वरूपापुढे आगीत उडी टाकायला कुणी धजत नव्हते. इतक्यात गर्दीतून एक माणूस पुढे सरसावला आणि धुराच्या लोटात विलीन झाला. आपणहून मृत्यूच्या जबड्यात उडी घेणारा कोण हे ओळखायला आल नव्हत. सर्व जण बंबाच काम डोळ्यात प्राण आणून करत होते. शेठजी आणि सीमाचा आक्रोश पहावत नव्हता. चार जणांनी त्यांना धरून ठेवले होते. धुराच्या लोटातून खांद्यावर माणूस आणताना एक व्यक्ती दिसत होती. तो बाहेर येताच सीमा व शेठजी त्याच्याकडे धावले. व्यक्तीला पहाताच सर्वांच्या तोंडून 'दिपक' कुळकर्णी साहेब ऽ वगैरे उद्गार निघाले.

शेखरची तब्येत सुधारली होती. दीपकच्या एक दोन जखमा भऱ्या व्हायच्या होत्या. दीपक पलंगावर बसला होता. बाहेर घराघरावर रोषणाई केलेली होती. दिव्याच्या प्रकाशात सारं शहर उजाळून निघाल होत. सीमा हातात निरांजनाच तबक घेवून दिपूकडे येत होती. दीपक आनंदाने तिच्याकडे पहात होता. सीमाच्या डोळ्यात आनंदाश्रू होते. तिने दीपकला ओवाळल. ओवाळत असताना तबकात दीपकच्या डोळ्यातून अश्रु ओघळले. त्याला गहीवरून आल. "अक्का आज, हीच ओवाळणी माझ्या जवळ आहे." "नाही दिपूभैय्या आज असे अश्रू ढाळायचे नाहीत वेडा का आहेस तू!" "नाही अक्का आज, हे अश्रू अश्रू नाहीत. फुल आहेत. ही फुल सांडू दे. त्यांना मज्जाव करू नकोस. कोमल, निष्पाप फुल ती. त्या फुलांना सांगु दे. जगात मंगलतेच महत्त्व पटवू दे." तोच निरांजनातली ज्योत फडफड करायला लागली तशी सीमा तिला हात लावून रोखण्याचा प्रयत्न करत होती. "अक्का दिव्याची फडफड माणसाच्या रोखण्याने का थांबते? तो विझायचा असेल तर विझू दे" "दिपू भैय्या का रे असं अभद्र बोलतोस! बघ मी तुझ्यासाठी खाऊला काय आणलय." पण! पण! ज्योत केव्हाच विझली होती. सीमाने एकदम टाहो फोडला. "दिपू भैय्या! केवढी मोठी ओवाळणी घातलीस रे तुझ्या अक्काला" सीमाच्या डोळ्यातून अश्रू गळत होते. पण सीमा त्यांना रोखत नव्हती. तिच्या कानात दिपूचे शब्द घुमत होते. "अक्का आज हे अश्रू अश्रू नाहीत. फुल आहेत निष्पाप, कोमल फुल" ती फुल समाजाला मंगलतेचे, नीतीचे, पावित्र्याचे महत्त्व सांगत होते आणि त्यांतच चंद्राच्या मंगल प्रकाशाची भर पडली होती.

———

# याला जीवन ऐसे नाव !

—एकनाथ देशमुख
F. Y. B. A.

लाल निळ्या आकाशातून सूर्याची किरणे बेदरकारपणे बाहेर पडली होती. सर्वत्र पक्षांच्या आवाजांचे संगीत वाजत होते. निसर्गाचं सौन्दर्य नुकताच डोळे चोळत चोळत जागे झाले. वस्तीच्या त्या खेड्यातही खळबळ सुरू झाली होती. शिवा गाईच्या दुधाची धार काढण्याच्या तयारीत होता. भिवान त्या आधीच गोठा स्वच्छ करून ठेवला. अंजू अजून निद्रादेवीच्या कचाट्यातून पूर्णपणे सुटली नव्हती. आई चहासाठी चुलीकडे गेली. मातीच्या भिंतींनी बांधलेल्या त्या घरातून आनंद बाहेर पडतच नव्हता. शिवा, भिवा व अंजू ह्या तीन मुलांची ती आई "पार्वतीबाई" ती आपल्या मुलांच्या प्रेमान पुरेपूर सुखी होती. वेळेचे चाक आपल्याच गतीने फिरत होते. परंतु एके दिवशी जणू त्या मातीच्या भिंतीला तडाच गेला, आणि पार्वतीबाई छातीच्या आजारान खाटल्यावर पडल्या तिन्ही मुलं आईच्या खाटल्याभोवती घिरट्या फिरत. डॉक्टरी उपचारही करून पाहिले. पण कुणाला माहित होत की पार्वतीबाई देवाला इतक्या आवडल्या म्हणून; त्यान त्यांना वर बोलावल. शेवटी पार्वतीबाईची प्राणज्योत विझली. शिवा, भिवा व अंजू ह्यांनी रडून रडून दुःखाला वाटा करून दिल्या. दिवसा मागे दिवस जात होते. शिवावर सर्व जबाबदारी येऊन पडली होती. शिवा वयाने मोठा होता. पण शिवाच्या मनाची शिव मात्र अश्रूंच्या पलीकडे नव्हती. भिवाचे शिक्षण व अंजूची देखरेख ह्यामुळे शिवाचे विश्व फक्त भिवा व अंजू ह्यांचे सुख पाहण्याइतकेच मर्यादित झाले होते. रात्र अन् दिवस केव्हा जाई हे विचारांना वळी पडलेल्या शिवाला समजतसुद्धा नव्हत.

भिवा ह्या वर्षी एम्. बी. बी. एस्. च्या शेवटच्या वर्षाला होता. घरच्या परिस्थितीमुळे त्याच मन शिक्षणाकडे ओढ घेण्यास तयारच नव्हत. पण शिवाने भिवाला समजावले, "भिवा, दुःखाच्या एकाच तडाख्याला बळी पडाव म्हणून का देवान मानवाला निर्माण केल ? नाही अरे, चंद्रालासुद्धा अमावस्येच्या काळोखात लुप्त व्हावे लागते, म्हणून काही चंद्र पुन्हा उगवणार नाही असे म्हणत नाही चंद्राला माहीत असत अमावस्येनंतर पौर्णिमा येतेच. हेच तर आपल्याही जीवनात आहे. भिवा ! तू डॉक्टर झाला म्हणजे माझ्या केलेल्या श्रमाचे साफल्य होईल. खरे मोल होईल. मग सांग तुला नाही का वाटत आपल्या भावाचे श्रमाचे साफल्य व्हावे ? ते काही नाही तू ह्या वर्षीही शिकायला जाणार. डोळ्यांना दिसणाऱ्या परिस्थितीचे व अदृश्य बंधुप्रेमाचे युद्ध भिवाच्या मनात चालू होते. अस्वस्थतेने बेजार झालेला भिवा म्हणाला, "दादा, केवळ मी डॉक्टर व्हाव म्हणून तू एवढी खटाटोप करतोस ना ? केवळ माझ्याच सुखासाठी ना ? मग तुझ सुख कोण पाहील ? आई ? ती तर ह्या जगात राहिली नाही. सांग ना दादा, कोण पाहील तुझ सुख ?" "भिवा अरे माझ सुख पहावयाला ही आपली आई नाही का" अंजूकडे बोट दाखवत शिवा म्हणाला. "आणि, हो तू डॉक्टर झाला म्हणजे माझ सुख पहाण्याची जबाबदारी तुझ्यावरच येईल ना !" शेवटी बंधूप्रेमाचा जय झाला व भिवाने शिक्षणास जाण्यास होकार दिला.

भिवान जाण्याची तयारी केली. परिस्थिती माणसाला बदलविते म्हणूनच की काय अंजू ही लवकर उठली. भिवा जाणार म्हणून तिने आपल्या लहान लहान हातान तिळेचे लाडू व दशम्या केल्या. हाताला लागलेल्या चटक्यांचे भान राहिले नाही. आईच जुन पातळ फाडून त्यात तिन ते सार भरल, आणि भिवा जवळ येऊन म्हटल "अण्णा, आईइतक चांगल तर नाही पण ती ज्या प्रेमान करीत होती त्याच प्रेमान मी हे केलेल आहे. तेवढ गोड करून घे" अंजूचे डोळे भरून आले होते. भिवाच्या ओठातून शब्द फुटत नव्हता. त्याच हृदयही पाझरत होत. जणू तो हृदयातून म्हणत होता, "अंजू, मागच्या जन्मी असं मी कोणत पुण्य केल होत की ज्याच फळ म्हणून मला तुझ्यासारखी



बहीण व दादासारखा भाऊ भेटला." भिवान अंजूला जवळ घेतल. तिचे डोळे पुसले व म्हणाला "अंजू दादासाठी ठेवलस ना काही ?" "हो" अंजू उत्तरली. शिवान गावातून पैसे उधार आणले व भिवाला दिले. अजून गाडीला अवकाश होता. भिवाने आपली पेटी उघडली. अंजू व शिवाने पिशव्या घेतल्या ते स्टेशनाकडे चालू लागले. वेळेवर गाडी आली. गाडीत सामान ठेवल्यावर शिवा म्हणाला "भिवा, कदाचित तुझ मन इकडच्या मायेने गुरफटून जाईल. पण हे लक्षात ठेव आमच सुख तुझ्या शिक्षणात आहे. परिस्थिती माणसाला बदलण्यास भाग पडते. पण माणूस आपल्या आन्तरिक श्रद्धेने परिस्थितीला हवे वळण देखील लावू शकतो. हेही तेवढेच खर आहे." गाडीची शिटी वाजली आणि काळोखाचा लोट फेकत गाडी चालू लागली- दूरपर्यन्त शिवा व अंजू भिवाकडे पाहत राहिलो.

पावसाळा लागला होता तरीपण मुसळधार पडणाऱ्या धारामुळे तप्त अशा धरतीची तहान मात्र भागत नव्हती. भिवाला जाऊन आज महिना झाला होता. महिन्याभरात त्याची दोन खुशालीची पत्रे आली होती. पण दुर्दैवाचे वादळ अधिकच वेगाने सुटत होते. शिवाच्या शारिरिक मुसळधार पावसानेही तप्त अशा सावकार व डॉक्टर लोकांची तहान भागत नव्हती. कर्जाऊ दिलेला पैसा मिळविण्यासाठी त्यांनं शिवाला अनेक धमक्या दिल्या, अनेकप्रकार त्रास दिला. पण गरीबीने श्रीमंतीपुढे नेहमीच मान वाकवलेली आहे. म्हणूनच शिवाने आपला जमिनीचा उरलेला लहान तुकडा व गोठ्यातील गाय विक्रीला काढली अंजू जिचे पाय अजून बाल्याच्या उंबरठ्यातून पुरेपूर बाहेरही पडले नव्हते तीच नशिबाने दिलेल्या दुःखाचे जहरी प्याले तिला प्राशन करावे लागत होते. शिवान गाय बाहेर काढली. गाईने एक हंबरडा फोडला. जणू त्या मूकमातेला सांगावयाचे होते. "हे काय अशा दुःखीत परिस्थितीत तुम्ही मला बाहेर काढता ?" अंजूच्या डोळ्यातून अश्रू ठिबकले आणि ती बिचारी तरी काय देणार अश्रूंच्या शिवाय. झाल. लहानपणीच वडीलांचे छत्र गेल, आईही गेली, अण्णा शिक्षणाला गेला, जमीन गेली आणि ती गोमाताही गेली. सार गेल. शिल्लक राहिल फक्त हे शिवाचं खंबीर मन व त्याच स्वप्न.

सार्या कर्जांची परतफेड करून शिवा घरी परतला. मिणमिणाऱ्या चिमणीच्या प्रकाशात अंजू उदासपणे बसली होती. शिवाच्या येण्याची चाहूल लागताच ती उठली व घरात गेली. शिवाने हातपाय धुतले. "अंजू ! काय केल आज ?" शिवाने विचारले. "भाकरी आणि शेंगदाण्याची चटणी" हातातील पाकीट शिवाकडे देत अंजू उत्तरली. "आणि हे काय ?" "अण्णाच पत्र" अंजू म्हणाली. वाढलेले जेवणाचे ताट तसच ठेवून शिवान घाईघाईने पाकीट फोडले व वाचायला सुरवात केली.

तीर्थरूप दादास,

शिरसाष्टांग नमस्कार

पत्र लिहिण्यास कारण की; -

दादा, आजच मी आमच्या येथील मेडकल्चा मुख्य सेक्रेटरी झालो आहे. म्हणून आज मी पहिल्याच दिवशी नवीन जेवण ठेवल आहे. काय असेल अस तुला वाटत ? लिहितो हं ! "तिळेचे लाडू व दशम्या" ज्याचा माझ्या हृदयाशी संबंध आहे. अंजूला शुभ आशीर्वाद. पत्राचा पुढील भाग कोराच राहिला होता. शेवटी फक्त होत ते हेच—

तुझा आज्ञाधारक भाऊ

भिवा

"वेडा कुठला" शिवाच्या मुखातून अस्पष्टपणे उद्गार बाहेर पडले. शिवाची छाती अभिमानाने फुलली. त्याने अंजूला जवळ बसविले व तिच्या तोंडात घास घातले. अंजूनेही दादाच्या तोंडात घास घातले. आणि ती दोघ आनंदाने त्या रात्री विसावली

काळाच्या पाखरांची भरारी नेहमीच वेगवान असते. आज कित्येक दिवसांपासून शिवा मजुरी करीत होता. एखाद्या जनावरासारखा; पण जनावराला तरी काम केल्यावर पुरेसे खायला मिळते. शिवाला तेही मिळत नव्हते. कधी सोमवार तर कधी शनिवार असे वार धरून शिवा जेवण टाळीत होता. दिवसेनदिवस त्यांची प्रकृती खालावत होती. जणू दैव आणि शिवा ह्यांच्यात एक शर्यतच लागली होती. पण... पण दैव सारखेच पुढे जाई. शिवा मात्र दुर्दैवाजवळ विसावा घेई. म्हणूनच भिवाच

पैशाविषयी कधी प्रश्न येत नव्हत. पण आज आल. कारण हे त्याचे परिक्षेचे शेवटचे दिवस होते. शिवाच्या स्वप्नाचे साकार रूप होते. भिवाच्या पैशांची व्यवस्था कशी करावी हा प्रश्न शिवाला सतवत होता. मजुरीच्या पैशान घर कसेबसे चालत होते. सावकारांची दारे शिवासाठी केव्हाच बंद झालेली होती. त्यांच्या निराशावादी विचारांच्या बाजारात " रंगराव " ग्राहक म्हणून आला आणि त्याने शिवाला पैसे देण्याचे कबूल केले.

रंगराव अनेक रंगानी रंगलेली व्यक्ती होती. शिवाला नदीच्या काठाने लांब दूरवर घेऊन गेल्यावर रंगराव म्हणाला " शिवा ! पाहिलस !" काठांच्या कपारीत पडलेल्या बाटल्या व डबे यांच्याकडे बोट दर्शविले. " काय ! दारूचा धंदा, छे छे नको " तिरस्काराने शिवा म्हणाला "अरे वेड्या ह्या बाटल्यांच्या मदतीनेच तुझा भाऊ डॉक्टर होईल डॉक्टर. आणि काय रे जनावरासारखी हमाली करण्यापेक्षा मर्दासारखे जगलो तर काय वाईट आहे. अरे, मी आहेच तुझ्या पाठीशी " काय करावं अन् काय न करावं हे शिवाला सुचत नव्हत. पण प्रेम आंधळ असते. मग ते कुठलेही असो. म्हणूनच शिवा रंगरावच्या रंगात रंगला. खोऽऽ खोऽऽ खोऽ रंगराव मोठ्याने हसला आणि पाकिटातून त्याने शिवाला शंभर रुपयांची नोट दिली. शिवाने त्वरीत भिवाला पैसे पाठविले व उरलेल्या पैशांत अंजूसाठी कपडे घेऊन तो आनंदाने घरी परतला अंजूऽऽ ' शिवाने हाक मारली. अंजू बाहेर आली ' अंजू, " हे बघ तुझ्यासाठी काय आणल आहे " तरी पण अंजू स्तब्ध उभी होती आनंदाच कोणतच चिन्ह तिच्या चेहऱ्यावर दिसत नव्हत. होती फक्त दुःखाची छाया. तिच्या कोवळ्या काळ्या ओठातून एकच ओळ बाहेर पडली. " दादा, आज फक्त मीठ भाकरी आहे " तिच्या त्या एका वाक्याने शिवाला जणू थपडच मारली आणि क्षणापूर्वी आकाशात उडणार शिवाच मन धाडकन खाली कोसळले. शिवाला आठवण झाली अंजू अजून माझ्यासाठी उपाशीच आहे थरथरत्या शिवाने अंजूला जवळ घेतले व तिचे मुके घेतले व अश्रू गाळले.

ठरल्याप्रमाणे आज शिवा कामावर जाणार होता. त्यान अंजूला सांगितले. " अंजू, मला यायला उशीर होईल, तू जेवण करून घ्यावच " " दादा कोणत्या कामाला जाणार आहे ?" अंजूने विचारले " हो " पण खर काम शिवा सांगू शकत नव्हता. घाबरत घाबरत शिवा नदीच्या काठाने चालत होता. रंगराव कपारीजवळ उभा होता. शिवाला पाहताच रंगराव म्हणाला " या शिवाजी या मला वाटल की येतच नाही काय ! या बसा. आसपास दोन चार इसम पिऊन वाटेल तसे बडबडत पडले होते. शिवा डब्यावर बसला होता आणि बाटल्या भरू लागला. " बर तर मी जातो " रंगराव सिगरेट पेटवीत म्हणाला. शिवान त्यावर नुसती मान हलविली. संध्याकाळ झाली. शिवा बाटल्या व डब्यांची आवराआवर करीत होता. पण हे काय ! पोलीसांचा छापा ! आज नेमका त्याच गुत्त्यावर पडला. पोलीसांना पाहताच शिवाच्या अंगाचा थरकाप होऊ लागला. पोलीसांनी शिवाच्या हातात बेड्या घातल्या शिवा वाटेल तशा विनवण्या करू लागला. पण व्यर्थ. " कायदा दयेचा पारखा असतो " समजल, कडकडत्या शब्दात इन्स्पेक्टर म्हणाले. बाजूला पडलेल्या इसमांना व इतर माल घेऊन शिवाला कचेरीत आणण्यात आले. बातमी पसरत पसरत अंजूपर्यंत येऊन पोहचली. त्या इवल्याश्या जीवावर जणू पर्वतच कोसळला. अंजू धावत धावत कचेरीत आली. दादाला कैदेत पाहून ती ओक्सा-बोक्सी रडू लागली. " दादा हेच का तुझे काम ? म्हणूनच मुक लागत नाही वाटत ?" प्रश्नाचा सारखा मारा अंजू करीत होती. गुडघ्यामध्ये तोंड खुपसून बसलेला शिवा ढळढळा रडत होता. " नाही अंजू नाही. हे सार मी पैशांसाठी केल होत. अंजू रडू नको अग दुःख सहन करून करून तू आजपावेतो जगलीस त्यात हेही एक सहन कर. " ' जा घरी जा " " दादा कोणत्या घरी जाऊ ? जिथ माझ कुणी नाही, आई नाही, भाऊ नाही. काय करू ह्या घराला मी ' " त्या घरातच आपल सर्व आहे. अंजू देवाला जे योग्य वाटेल तेच होईल. दुःखाच ओझ घेऊन जात होती अंजू व दुःखाच्या आगीत भाजत जात होता शिवा.

चौकशी करून इन्स्पेक्टरने रंगरावला बोलावले. " पकडण्यात आलेला दारूचा गुत्ता व हा इसम हे आपल्या मालकीचे आहे काय ? इन्स्पेक्टरने विचारले " नाही " रंगराव म्हणाला, वीज कोसळल्यासारख शिवाच मन कापल. त्यान निरखून पाहिले. रंगरावचा रंग



त्यावेळी बदलला होता. " इन्स्पेक्टर साहेब मला दारूचा धंदा करण्याची जरूरत तरी काय ? ईश्वरकृपेने माझ्या घरी सर्व आहे. " सिगरेटीचा झुरका घेत रंगराव म्हणाला. " साफ खोट. हा गुत्ता ह्याच्याच मालकीचा आहे इन्स्पेक्टर " शिवा ओरडला. पण इन्स्पेक्टरने त्याला गप्प बसण्यास सांगितले. झाल, रंगराव तेथून निघून गेला. शिवा मात्र कायद्याच्या जाळ्यात अडकला शिवावर खटला भरण्यात आला. कोर्टासाठी आज त्याला जिल्ह्याच्या गावी नेणार होते. त्यापूर्वी शिवान अंजूला सांगितले, " अंजू, माझ्याविषयी भिवाला काही समजता कामा नये; तुला माझी शपथ आहे " व शिवाने अंजूकडे पाठ केली. अंजू दगडासारखी उभी होती. " दादा, तुला देण्यासाठी माझ्याजवळ अश्रूसुद्धा नाही " असं म्हणून हातात तोंड लपवत अंजू निघून गेली.

कोर्टाची वेळ झाली. पोलीसांनी शिवाला कोर्टात उभे केले. वकीलांनी सारे पुरावे स्पष्ट करून दिले. बापूसाहेब न्यायाधिशांनी एक तीक्ष्ण नजरेने शिवाकडे पाहिले त्याच्या डोळ्यातून पाणी पाझरत होते तो निराधार मृत शरीराप्रमाणे उभा होता. कायदा जरी दयेला पारखा असला तरी पण कायदे करणारा तर माणूसच आहे. तो तरी कसा विसरेल दयेला ! म्हणूनच की काय बापूसाहेबांनी निकाल पुढील दिवशी ढकलला; शिवाविषयी त्यांना आपुलकी वाटू लागली होती. दुपारच्या वेळी बापूसाहेब कचेरीत आले. त्यांनी शिवाची भेट घेतली. व त्याला खुल्या दिलाने, प्रेमाने जवळ बसविल व शिवाला सविस्तर विचारले. शिवाने अथपासून इतिपर्यन्त घडलेली कथा सांगितली. बापूसाहेबांचे डोळे डबडबून आले होते. त्यांनी डोळ्यावरील चष्मा काढला व डोळे पुसले; व म्हणाले "हं. तर हे सार तू भिवासाठी केल. पण शिवा तू हे विस तो की लक्ष्मणाला जे महत्त्व आले ते रामामुळेच म , तुला जर खरा भिवा लक्ष्मण व्हावा तर तुही रामासारखी कामे केली पाहिजेत" शिवा म्हणाला " दैव आणि परिस्थिती यांचा ज्यावेळी माणसाला सामना करावा लागतो त्यावेळी राम लक्ष्मणाला महत्त्व नसते बापूसाहेब. ते फक्त जगात व्यवहारात सांगण्यापुरते असते " " तुम्हीच सांगा, माझी परिस्थिती तुम्ही ऐकलेली आहे. पण उद्या कोर्टात तुम्ही "मला निर्दोष सोडाल का ?" नाही मुळीच नाही " बापूसाहेब स्तब्ध उभे होते. आज त्यांच्यासमोर असा गुन्हेगार उभा होता जो समाजाच्या व कायद्याच्या न्यायमंदिरात गुन्हेगार तर माणुसकी व कर्तव्याच्या न्यायमंदिरात पुरपूर निर्दोष होता बापूसाहेबांनी घड्याळाकडे पाहिले व शिवाचा निरोप घेतला.

कोर्टात काय निकाल द्यावा याचा उमज बापूसाहेबांना पडत नव्हता. पुरावे, समाज, कायदा यांच्या बेड्यानी बापूसाहेब पूर्णपणे जखडून गेले होते. त्यांच्यामध्ये इतकी ताकद नव्हती की ते ह्या बेड्यांना तोडू शकतील. नाईलाजाने बापूसाहेबांनी शिवाला दोन महिने कैदेची शिक्षा फर्मावली. पोलीस शिवाला घेऊन निघाले कोर्टाबाहेर बापूसाहेब उभे होते. त्यांनी शिवाला छातीशी लावले आणि अश्रू गाळीत म्हणाले " शिवा तू, जिंकलास मी हरलो " व ते निघून गेले. शिवाला जिल्ह्याच्या कचेरीत ठेवण्यात आले. अंजू घरात एकटीच पडली. गावात भांडी घासून ती आता जीवन जगत होती. दिवसभर कामे करावी व रात्री भकास घरात एकटेच पडावे. कधी कधी तिला वाटे " आयुष्यभर मला दुःखच मिळेल का ? एकटच राहाव लागणार का ! त्यापेक्षा मरण का येत नाही ? अण्णाला कोणाकडूनही पत्र लिहून सार कळवाव. पण दादाची शपथ ! " अशा विकट परिस्थितीत तिला आधार मिळाला तो शेजारच्या भिकारणीचा. अंजू कामावरून आली म्हणजे रोज त्या भिकारणीशी बोलत बसे. तिच्या सहवासात तिच एकाकीपण कमी होई भिकारणीने भीक मागून आणलेले तुकडे व अंजूला मिळालेले तुकडे एकत्र होत व त्या दोघींच्या पोटांचा एखादा कोपरा भरत असे.

असे चालत असताना बरेच दिवस निघून गेले. शिवाला त्यांच्या कैदीतील चांगल्या वर्तणुकीमुळे लवकर सोडण्यात आले. दीड महिन्यापासून चार भिंतीत डांबलेल्या शिवाला आज निसर्गाच रूप दिसत होते. त्याने आपल्या वाढलेल्या दाढीवर हळूवार हात फिरवला. अंजूच्या भेटीसाठी त्याच मन उतावळ झाल होत. त्याला आपल्या सूडाचा बदला घ्यावयाचा होता. पण शिवाच्या शरीरात आता शक्ती उरलेली नव्हती. खिळखिळलेले शरीर, वाढलेली दाढी व फाटलेले कपडे यामुळे जग त्याला शिवा म्हणून ओळखत नव्हते तर एक कैदी म्हणून ओळखत

होते. रात्री शिवाने गाडी पकडली. काळोखाच्या बाहुपाशात सारे विश्व स्वस्थ पहुडलेले होते. डब्यातही प्रवासी पेंगुळलेले होते. जागा होता फक्त शिवा. रात्री दोन वाजता शिवा आपल्या गावाच्या शिवेवर आला. गावातील झोपड्या, झाडे जणु त्याला चिडवीत होती " हा आला शिवा दारूड्या " " काय कशी काय वाटली कैदेची हवा ! " शिवाच मन घाबरत होते. तो कसाबसा घरापर्यंत येऊन पोहचला. कुत्रे भुंकत होते. अंजू घराच्या बाजूला झोपली होती. शिवाच्या डोळ्यातून आता प्रेमाश्रू वाहत होते. त्याला वाटल, अंजूला जवळ घ्याव, पण नाही. शिवाने तसे केले नाही. ती किती हाल-अपेष्टा सहन करत असेल ! किती काम करत असेल ? थकेली असेल. एखाद्या निष्पर्ण झाडाच्या फांदीसारखे तिचे हातपाय वाळलेले होते. बाजूची घराची भिंत पडून तेथे उकीर्डा झाला होता. दोनचार कुत्रे तेथेच मातीत झोपले होते, शिवाही बाजूला जाऊन झोपला. त्याच्या मस्तकात विचारांच वादळ भडकल. भिवाला, अंजूला समाज काय म्हणेल ! दारूड्याची भावंड ! कैद्यांची भावंड ! त्यांची नाचक्की करतील. अशा प्रश्नांनी त्याचा जीव गुदमरत होता व त्यातच त्याचे डोळे बंद झाले.

दाही दिशांवर सूर्याची किरणे पसरत होती. गावाच्या त्या पाऊल वाटेवर भिवा आज डॉक्टर होऊन उतरला होता. दादा व अंजू यांच्या भेटीसाठी त्याची पावल झपझप पडत होती. हातात मिळालेली पारितोषिके व पेटी घेऊन तो घरापर्यंत आला. पण दारात पाय ठेवण्याच्या आधीच त्याच्या हातातील पेटी व पारितोषिके खाली कोसळली. त्याला दरारून घाम फुटला. समोरच्या दृश्यावर त्याचा विश्वास बसेना. पडलेल घर, मातीने माखलेले अंजूचे शरीर व बाजूला पडलेले भाकरीचे तुकडे-काय आहे हे ? तिच्याच बाजूला पडलेला दादा ! काय वेष, हाल होते त्याचे ! भिवाने जाऊन अंजूला छातीशी लावले. अंजू घाबरून उठली, " कोण अण्णा ? केव्हा आलास ? हे स्वप्न तर नाही ना ? " नाही अंजू नाही.



अंजू ही दशा केलीस, मला का बोलाविले नाही " " धिक्कार माझ्या शिक्षणाला, माझ्या डॉक्टर होण्याला " " अण्णा डॉक्टर झालास ? खर ? अण्णा आता मला भीक मागावी लागणार नाही ! " भिवा लहान मुलासारखा रडत होता. त्यान अंजूच्या पायावर डोके टेकविले " हे काय अण्णा, मी तुझ्यापेक्षा लहान आहे" नाही अंजू तू किती महान आहे हे मीच ओळखतो. तूच माझी आई आहेस" अंजूने भिवाला उठवले व मागे वळून पाहिले हे काय कोण आहे ? अंजू म्हणाली " दादा आहे आपला " अंजूच्या हृदयातून आज प्रथमच आनंदाची किरणे बाहेर पडली होती. ती चटकन जाऊन शिवाच्या अंगाला बिलगली. भिवा शिवाच्या पाया जवळ बसला पण शिवा मात्र तिळभरही हलला नाही. अंजून हाक मारली, " दादा, बघ तरी अण्णा आला आहे " डॉक्टर होऊन तुझे स्वप्न खरे झाले ! दादा ! तरीही शिवा हलला नाही. भिवाने शिवाची छाती पाहिली आणि मोठ्याने टाहो फोडला ' दादाऽऽऽ दादाऽऽ ' शिवा त्या घरट्यात नव्हता. मायेचे ते पाखरू उडून गेले होते. होते ते फक्त शिवाचे मृत शरीर. " दादा काय झाल हे ! तुझं सुख पाहण्याची खूप जबाबदारी दिली मला ! बोल ना दादा " भिवा ढळाढळ रडत होता. क्षणात बाहेर पडणारी अंजूची आनंदाची किरणे दुःखांनी ग्रासली होती. व ती पुन्हा दुःखाच्या दरीत कोसळली. बाजूला लोकांची गर्दी जमली होती. त्यातुन वाट काढीत काढीत बापूसाहेब आले त्यांनी शिवाच्या मृत शरीराकडे पाहिले व मान खाली घातली. कोणी जवळचा नसतानाही ते ढळाढळ रडत होते. ते भिवाला म्हणाले " भिवा,! शिवाचच काय पण प्रत्येक गरीबाच स्वप्न हे स्वप्नच असते.

शिवाला जाऊन आज वर्ष झाल होते. आज बापूसाहेबांच्या मदतीने भिवाने आपल्या दादाच्या स्मरणार्थ " शिव हॉस्पिटल " काढले होते. अंजू आनंदी होती. तियेच– त्याच घरट्यात– जिथे ती मायेची पाखर रहात होती.


---

## पुण्यस्मृतीस अभिवादन—



कै. ह. वि. पाटसकर

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा : टेनिस विजयी संघ



आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा : फुटबॉल विजयी संघ







# ऊब....

—श्रीपाद याज्ञिक

आलिशान बंगल्यातील एक रूम. भिंतीवर नटीच्या निरनिराळ्या पोझेसमधील कॅलेंडर्स. खिडकीतून येणार लख्ख उन पलंगावर पडलयं; नि मच्छरदाणीत रजई पांघरून स्वारी हाराहुर झोपलीय्. दुधवाल्याच्या आरोळीने तुषार जागच्याजागी चूळबुळ करतो. काही क्षणांनी 'शब्बा' हासडत उठतो. " च्यायला आज इतक्या लवकर का तडफडलासे !" म्हणून विचारतो. " आठ वाजेलत साहेब लवकर कसं ?" " म्हणे आठ वाजले ! अरे असनादिक कधी इतक्या पहाटे उठले आहेत का आजतागायत ? चल जा " तुषारने पुन्हा गादीवर अंग टाकले. एकटा जीव अन् सदाशिव. त्याचा का कुणी मालक होता ? पण प्रमोशनसारखी झोप आता दुरावली होती. तरी तो उशीत तोंड खुपसून पडून राहीला

बाहेरील नळावर भांड्यांचा खडखडाट चालू होता. शेजारचा कुळकर्णी पाणी भरत असेल लकाचा ! अंडरपँटमध्ये पाणी उपसणाऱ्या कुळकर्णीचे ध्यान त्याच्यापुढे आले. वास्तविक कुळकर्णी त्याच्याहून अवघा एक वर्षाने मोठा. पण त्याच्यासारखं मनमुराद सुख काही तो उपभोगू शकत नव्हता. बिचारा कुळकर्णी ! लग्न करणे हेच बेट्याचे ध्येय. आता बस म्हणाव घाण्याच्या बैलासारखा संसार ओढत. नि त्याचा तो पोटाचा नगारा. छे छे. तुषारला एकदम किळस आली. नो. नो. आय् शॅल् रिमेन अलोन.

तुषारने पलंगाहून टुणकन् उडी मारली. ब्रशने दात घासत तो आरशासमोर जाऊन उभा राहिला. " काय चिकण दिसतो मी !" आपल्या कुरळ्या केसावरून त्याने अभिमानाने हात फिरवला. नाही तर तो टकल्या गोखले. हाऊ ओल्ड ही लुक्स. तो स्वतःवर बेहद्द खुष झाला. त्याच्या भरदार छातीकडे तो एक टक पहात राहीला. कपाटातील विविध अत्तरांच्या बाटल्यांकडे त्याने दृष्टिक्षेप टाकला. तारे, मार्लेना हे कुठचे परवडणार ? दोन, दोन पोरांचे बापना ! तुषार मग त्याच्यावर 'मरणाऱ्या' एक एक पोरीची आकृती मनात साठवू लागला. 'टपाल' म्हणून पोस्टमनने पत्र टाकले. त्याने चटकन ते उचलले. परंतु अक्षराकडे पहाताच त्याच्या कपाळावर आठी चढली. वडलांचे पत्र— मजकूर न वाचताच त्याला पाठ होता. " तुझी लग्न करण्यास संमती असल्याचे कळव म्हणजे बरे होईल " हा एकच धोशा त्यांनी मागील वर्षापासून लावला होता. " माझी लग्नाची मुळी इच्छाच नाही " असे त्याने अनेकवेळा कळवले होते. कुळकर्ण्यांसारखी स्वतःची परवड तो कधीच होऊ देणार नव्हता. ओशट, निःसत्व गचाळ जीवनाची त्याला घृणा होती.

दार ठोठावल्याचा आवाज झाला. त्याने पत्र बाजूला भिरकावले पुढे होऊन दार उघडले. शेजारच्या कुळकर्ण्यांचा राजू उभा होता. त्याचे नाक शेंबडाने भरले होते, त्याची चड्डी मातीने रंगली होती. हे कारट कशाला आल ! म्हणून तुषार वैतागला. त्याच्या रूमचा दिमाख बिघडल्या-सारख त्याला वाटल. लग्नाची ही परिणीती ! यासाठीच बागांना जीव कासावीस होतो आहे. " म्हणे मला नातवाचं तोंड पहावयाचं आहे ? " म्हाताऱ्या लोकांच्या ह्या नुसत्या सबबी. पण मी नाही, माझं असं बाटोळ होऊ द्यायचा. बायको नि पोर. हे लोक कशी काय माझी अँबिशन ओळखणार ? खुराड्यातल्या कोंबड्यांना राजहंसाच्या जीवनाची काय कल्पना ? " आईने हे लाडू दिलेत तुम्हाला काका. " राजू म्हणत होता. सफेती दिलेल्या भिंतीसारखा त्याचा चेहरा एकदम कळकळला. तो स्वतःशीच मोठ्याने हसला. सगळ्या गल्ली-तल त्याच्यावर फिदा आहेत हे तो जाणून होता. माडी-वरल्या जोशी, समोरच्या खांडेकर, पलीकडल्या फडके, सगळ्या त्याच्याकडे चोरून चोरून पहात असत, विवाहित काय नि अविवाहित काय, त्याला चाहत होत्या, मानत होत्या. त्याच्या मात्र त्या खिजगणतीत नव्हत्या. देखते रहो भ्रमराने फक्त फुलांना वेड लावायचे.

तुषारने कोको घेतला आणि कपडे केले. बाजारातून तो काही फळे खरेदी करणार होता. गेटमधून आत जाताच त्याच्यासमोर नेने दत्त म्हणून उभा. त्याच्या सायकलला दोनतीन पिशव्या लोंबकळत होत्या व मागे कॅरिअरवर एक पोरग चिटकून बसल होत तुषार त्याला टाळणारच होता. पण सहजच त्याने विचारले, ". चक्तोस खोलीवर, जरा गप्पा टाकू" नेनेचा अपराधी चेहरा पाहून मात्र त्याला कीव वाटली. नेने म्हणत होता, " तुझ्यासारखे सडेफटींग नाही बाबा आम्ही. अजून भाजी न्यायची आहे. नाहीतर घरी... होईल चांगली." 'ओऽ के' म्हणून तुषार रुबाबदारपणे उद्गारला व ठेक्यात चालू लागला. मार्केटमधल्या सगळ्या लोकांबद्दलच त्याला दयाबुद्धी वाटू लागली. पिशवी हातात नसलेला तो एकटाच होता ! त्याची छाती गर्वाने फुलून आली. समोरच्या टोपलीतील लाल टमाटा त्याने उचलला गालगुच्चा घ्यावा तसा दाबला. त्याला मजा वाटली. पलीकडच्या दुकानावर स्त्रिया घोळका करून वेण्या घेत होत्या. तुषारला त्याच्या मोठ्या भावाची तीव्रतेने आठवण झाली. लग्न झाल्यावर भावाने वेणी आणली नाही म्हणून नवरा-बायकोत खूप भांडण झाल होत. बरेच दिवस ते ओल्या लाकडासारख धुमसत राहील होत. डॅम इट. तो पुटपुटला. रुमालात सफरचंद बांधून परतला.

नेहमीप्रमाणे बरोबर पावणेसहाला तो ऑफिसातून घरी आला. तोंड धुवून, कपड्यांना सेंट लावून तो फिरायला निघाला. शीळ घालत तो हळूहळू चालला होता. जांभळी आरस्पानी संध्याकाळ खुलली होती. लाजून लाल झालेल्या पश्चिमेशी सूर्य गुफ्तगू करत होता. मोटारी स्कूटर्समुळे हवेत एक वेगळाच दर्प पसरला होता. हमरस्ता त्याला भेटायला येणाऱ्या रसिकाला मानाचा मुजरा करीत होता. तुषार आपल्या धुंदीतच एक एक पाऊल टाकत होता. त्याला कसली गर्दी नव्हती. कुणाचा धाक नव्हता. नेनेसारखा तो कुणाला डरत नव्हता. नेनेच्या बायकोची त्याने रींगमास्तरशी मनोमनी तुलना केली. त्याबद्दल खरच, शास्त्रज्ञ सले, पृथ्वीवरून चंद्रयानाचे नियंत्रण करोत, पण बायका जे पुरुषांचे नियंत्रण अहोरात्र करतात त्याची सर नाही यायची कशाला. केव्हा पहाव तेव्हा नेन्या आपला चिंतातूरपणे घड्याळाकडे पहातच असतो ! या चिंतातुर जंतूंना एकदा मुक्ती द्या तरी !... तुषार



एकदम रस्त्यावर थुंकला. कसले हे भेकड नवरे, कुणी आपल्यावर असा अधिकार चालवावा हेच तुषारला भयंकर वाटले. का ? पण का ? त्याला कुठे होती कशाची गरज ? तो होता एक बादशहा ! आजुबाजूची वाहनं स्त्रीपुरुष सगळे त्याच्या दिमतीला रुज्ज होते. सगळे जग त्याच्या टाचेखाली जणू तो चिरडीत होता. त्याच्या सेवेला होता सगळा हा साज. त्याचा ठसा तो प्रत्येक वस्तूवर उमटवत होता. सर्व विश्वात अहमहमिका चालली होती त्याच्या सेवेची. या जगाचा तो होता स्वामी, उपभोग घेणारा. स्वच्छंद विहरणाऱ्या पंडोलाची कल्पना त्याला चाटून गेली. कोपऱ्यावरील पोस्टरवर, एक स्त्री वाकून नमस्कार करीत असल्याचे चित्र होते. तुषारने चुटकी वाजवली. तुझी तीच पात्रता. तुझी तीच जागा.

मस्त जेवण करून तुषार लॉजच्या बाहेर पडला. एक झकास पान तोंडात ठेऊन, सिगारेटच्या धुराची वलये काढीत तो परतला. रूमवर जाण्याऐवजी नेनेकडे एक चक्कर टाकावा असे त्याने ठरवले. असे करण्यात त्याला एक आगळेच, सैतानसुख मिळत असे. आपले मोठेपण प्रत्ययास येत असे. नेन्याच्या दाराजवळ त्याने सिगारेट पायाखाली चिरडली. अन् दारावर टक् टक् केले. नेनेच्या पत्नीने येऊन दार उघडले. केस विसकटलेल्या, तेलकट चेहऱ्याच्या मिसेस नेनेकडे त्याला पहावेना. हीच का पूर्वाश्रमीची अर्चना गुप्ते ? कॉलेज क्वीन. ती दोघे एकाच वयाची, पण कुठे तो नि कुठे ती ! मटारच्या शेंगेसारखी रसरशीत कांतीची अर्चना आता वाळक्या खारकेसारखी दिसत होती. सगळे एका माळेचे मणी. लग्न करून धन्य झालेले ! पिचलेले, खचलेले, भिन कण्यांचे प्राणी, तुषारने उसने हसून विचारले, " दि ग्रेट नेने क्या कर रहे है ?" " नुकतेच झोपलेत ते. आज काम फार पडल त्यांना म्हणून लवकरच झोपलेत." बाजूच्याच कॉटवर नेने पोटाशी पाय घेऊन निजला होता. मिसेस नेने कॉटजवळ गेल्या त्यांनी रगाची घडी मोडली व तो हलकेच नेनेच्या अंगावर पांघरला. अन् बोलणे संपवावे तशा आवाजात घाईघाईने त्या म्हणाल्या, " मी सांगेन त्यांना तुम्ही येऊन गेल्याचं, बर का !" " ऑल राइट " तुषार उद्गारला. पण भिंतीवरची पाल आपल्याकडेच पाहून चुकचुकली असं त्याला उगीचच वाटलं.



बाहेर आता लख्ख चांदणे पडले होते. सृष्टीच्या फोटोग्राफरने जणू प्रचंड लाईट त्याच्या स्टुडिओत लावला होता. रस्त्यावरील रहदारी मावळत चालली होती. तुषारला का कोण जाणे एकदम अस्वस्थ वाटू लागले. त्याच्या चेहऱ्यावरचे विजयी हास्य आता लोपले. त्याची मुद्रा उतरली. काहीतरी चुकल्यासारखे, हरवल्यासारखे त्याला झाले. त्याच्या मनात एकदम पोकळी निर्माण झाली. सगळं ओक, ओक नीरस वाटू लागल. मिसेस नेनेची आकृती पुनः पुनः डोळ्यापुढे येऊ लागली. त्यांनी पांघरलेल्या रगात, बंधनात, प्रेमाच्या ओलाव्यात नेने गुरफटून सुखात झोपला होता. तुषार मात्र एकटा होता. कसले बादशाही वैभव अन् कसचे काय सगळे व्यर्थ होते. नुसता भास. एखादा टॉवर उंचच उंच नि भव्य असला तरी तो असतो दगडी, हीन. काय अर्थ आहे त्याच्या ताठरपणात, तोऱ्यात ? कुळकर्णींच सुखी असले पाहिजेत. आपल्या मुलांसाठी झिजण्यात केवढे अप्रुप वाटत असेल त्यांना ! किती मग्न असतात ते पोरांचे कोडकौतुक करण्यात. त्यांच्या चेहऱ्यावरील तृप्ती आपल्याला कधी भावली नाही आजपर्यंत ? आपण नेहमी बलख अलेले, घमेंडीत...... वातावरणात नीरव, शांतता होती. सगळं स्तब्ध, चिडीचूप होत. कडेच्या घरातील जोडप एकमेकाला लगटून गॅलरीत उभ होत; एकमेकाच्या उबेत, सहवासात. प्रत्यकजण असाच आपापल्या घरात, आपापल्या विश्वात बुडला असेल

तुषारला कमालीच एकाकी वाटू लागल. तो होता एकाकी, हद्पार मनुष्य. कुणालाच तो नको होता. सगळे त्याला टाळत होते. एकामागुन एक बंद दाराकडे त्याने अगतिकतेने नजर फिरवली. ती त्याला भेडसावत होती, हिणवत होती.

तुषार घराजवळ येऊन पोचला. पायरीवर एक कुत्र थंडीने कुडकुडत पडल होत. त्याच्याकडे पाहून त्याच्या पोटात कुठेतरी तुटल. हवेतला थंडीचा कडाका आता अगदी असह्य झाला होता. तुषारच्या छातीत हुडहुडी भरली होती. त्याच मन बधिरल, विकुडल. त्याने जोरात दार उघडल. सगळ घर त्याला खायला उठल. भयाण, थंड, जड वातावरण घरात भरून राहिल होत. कुळकर्ण्यांचा राजू, नेने गल्लीतील सगळे सगळे त्या जगाच्या स्वामीला हिणवत होते. तुषारने व्याकुळ होऊन दिवा लावला. तरीही मिसेस नेनेचे निवलेले डोळे त्याचा पाठलाग सोडत नव्हते. त्याच्या पायाला काहीतरी लागल ते वडिलांच पत्र होत. सकाळी त्याने भिरकावलेल. त्याच्याकडे तो वेड्यासारखा पहात राहीला. अन् मग झपाटलेल्या माणसासारखा कपाटाकडे धावला. कपाटातून एक कार्ड त्याने खसकन् ओढले. कशीबशी पेन उघडली नि वडिलांना उद्देशून लिहिले, " बाबा, माझी लग्नाला पूर्ण संमती आहे. शक्य तितक्या लवकर......" त्याला धाप लागली होती. वातावरण सुन्न होते. तुषार वेगाने पत्र पुरे करीत होता.

———


## जळगावातील विश्वसनीय व सर्वात जुना बुक डेपो—

# मे. नेवे ब्रदर्स बुकसेलर्स, जळगाव.

आ म चे क डे —

प्राथमिक व माध्यमिक शाळेला, कॉलेजला, लागणारी सर्व प्रकारची पुस्तके, स्टेशनरी पॉलीटेक्नीक कॉलेजला लागणारे साहित्य किफायतशीर भावात मिळेल.

ए क वे ळ ये ऊ न खा त्री क रा वी —

**नेवे ब्रदर्स बुकसेलर्स, जळगाव.**

# ऐकू न येणारे गूढ ध्वनी—

—विनायक यशवंत वैंडाळे
F. Y. B. sc. 'B'

खर्ज, मंद्र आणि तार हे तीनही स्वरांचे प्रकार मनुष्याच्या कानाला ऐकू येणाऱ्या सुरांचेच आहेत; परंतु मनुष्याच्या कानाला "ऐकू न येणाऱ्या ध्वनींचा" एक प्रकार आहे, याची आपल्याला कल्पना नव्हती ऐकू न येणारे ध्वनी दोन प्रकारचे असू शकतात. "खर्जाच्या" खालचा किंवा "तार" स्वराच्या वरच्या स्वरांचे जे ध्वनी असतात ते मनुष्याच्या कानाला ऐकू येऊ शकत नाहीत. यापैकी तार स्वरांच्या वरच्या "ऐकू न येणाऱ्या गूढ ध्वनीबद्दल" अलीकडे रशियात आणि अमेरिकेत व इतर पाश्चात्य देशांतही झपाट्याने संशोधन होत आहे. भारतात मात्र ऐकू न येणाऱ्या गूढ ध्वनीबद्दल पुष्कळशा कल्पना काही शतकापूर्वीच्या विद्वान मंडळींना आलेल्या असाव्यात, असे मानण्याला मंत्रविद्येच्या रूपात भरपूर पुरावे उपलब्ध आहेत.

प्रत्येक सेकंदाला साधारणपणे ५०० ते २००० कंपने असणारा ध्वनी मंद्र सप्तक या सदरात मोडतो. सेकंदाला तीन हजार कंपनांच्या जवळपासच्या स्वरांना भारतीय संगीतात तार स्वर म्हणतात. वयोमानाप्रमाणे मनुष्याला साधारणपणे सोळा हजार कंपनांपर्यंतचे, आणि फारच झाले तर वीस हजार कंपनांपर्यंतचे स्वर ऐकू येऊ शकतात. वीस हजार कंपनांपेक्षा अधिक कंपनांचे स्वर मनुष्याच्या कानांना मुळीच ऐकू येत नाहीत. या ऐकू न येणाऱ्या ध्वनीलाच "पराश्राव्य" (Ultra-Sonics) म्हणतात. ऐकू न येणारे "पराश्राव्य" ध्वनी हा एक आश्चर्यजनक आणि मोठा क्रांतिकारक असा संशोधनाचा विषय आहे.

'पराश्राव्य' ध्वनी तोंडाने काढणे, किंवा कानाने ऐकणे, या दोन्ही गोष्टी मनुष्याला करता येत नाहीत. असे जरी असले तरी 'पराश्राव्य' ध्वनी तोंडाने काढणारे आणि कानाने ऐकू शकणारे असे कित्येक प्राणी आणि कीटक या जगात आहेत. मनुष्याला नेहमी परिचित असलेल्या कुत्र्याला पराश्राव्य ध्वनी ऐकू येतात त्याच-प्रमाणे अंधारात रात्री उडणाऱ्या पाकोळ्यांना आणि वटवाघुळांना पराश्राव्य ध्वनी काढता येतात, आणि ऐकूही येतात. इतकेच काय, पण पराश्राव्य ध्वनी तेच जणू काय प्रकाशकिरण आणि कान हेच जणू काय डोळे असाच त्या दोन्हींचा वटवाघुळांना उपयोग होतो. वटवाघुळे कानांनी पाहतात; डोळ्यांनी नव्हे. दोनशे वर्षांपूर्वी इटालीयन शास्त्रज्ञ स्पालान्झानी याने वटवाघुळांच्या या विचित्र शरीरधर्मांचा प्रथम शोध लावला. वटवाघुळे जो "पराश्राव्य" ध्वनी तोंडाने काढतात तो समोरच्या पदार्थांवर आपटून झालेला प्रतिध्वनी परत त्यांच्या कानांना ऐकू येतो, अशा रीतीने समोरच्या पदार्थांचे अस्तित्व आणि अंतर याबद्दल वटवाघुळांना अंधारातही अचूक ज्ञान होत असते.

पराश्राव्य ध्वनी निर्माण करण्याची व ऐकण्याची पहिली यंत्रसामुग्री फ्रेंच शास्त्रज्ञ "पॉल लांजेव्ही" या कल्पक शास्त्रज्ञाने १९१६ साली तयार केली. त्याला त्याने 'ट्रान्सड्यूसर' हे नाव दिले. तसेच पराश्राव्य ध्वनी टिपण्यासाठी (Detection) रशियन शास्त्रज्ञांनी तयार केलेले अत्यंत संवेदनाक्षम असे 'रेडिओ मीटर' नावाचे साधन आहे. अलीकडच्या काळात नव्या शास्त्रज्ञानावर आधारून तयार केलेले हायड्रोफोन (Hydrophone) या नावाचे सुधारलेले उपकरण वापरण्यात येते. हायड्रोफोनच्या साहाय्याने आता पाण्याखाली दडलेले धोके हुडकून काढता येतात. इतकेच नव्हे तर त्यांच्यामधले अन्तर आणि त्यांची गती यांचा बरोबर अचूक अंदाज करता येतो.

पराश्राव्य ध्वनीच्या साहाय्याने आता महासागराची खोली इंच अन् इंच अचूकपणे मोजता येते. आणि त्याच्या पोटातील खाचखळगे, डोंगर, उंचवटे, बुडालेली जहाजे यांचे अगदी तंतोतंत नकाशे काढता येतात. डोळ्यांना न दिसणाऱ्या, पण कानांना ऐकू येणाऱ्या अशा आवाजाच्या साबल्या पराश्राव्य ध्वनीमुळे आता पाहता येतात व त्यांचे फोटोही काढता येतात. पाण्याच्या





थेंब्यात असलेले रोगजंतू पराश्राव्य ध्वनी देताच क्षणार्धात मरण पावतात. क्षय आणि घटसर्प यासारख्या भयानक रोगांचे जंतू देखील अशा प्रकारे पराश्राव्य ध्वनीने मारता येतात, असे अनेक प्रयोगांवरून रशियन शास्त्रज्ञ दोकिव्हो आणि डोब्रोव्होल्स्की व कुसनेटोव्ह यांनी सिद्ध केले आहे. डांग्या खोकल्यावरच्या जंतूंवर पराश्राव्याचा मारा केला असता ते एक प्रकारचे विष बाहेर टाकतात. त्याला "उत्सर्जित विष (Endotoxin) म्हणतात. हे विष गोठविले असता त्याचा विषधर्म नाहीसा होतो व तेच डांग्या खोकल्यावर अचूक परिणामकारक औषध म्हणून वापरता येते. कॅन्सरची गाठ जर फार लहान असेल तर ती क्ष किरणांच्या साहाय्याने शोधून काढणे फारच कठीण असत. आता मात्र पराश्राव्य ध्वनियंत्रामुळे ही अडचण दूर झाली असून पराश्राव्य-ध्वनीने कॅन्सर, ट्युमर यासारख्या रोगांचे सुगावे लागणे शक्य झाले आहे.

पराश्राव्य ध्वनींच्या अतिशय जोरदार लहरींच्या झोतामुळे मनुष्याला मूर्च्छा येते. किंवा त्याचा तोल सुटून त्याला मळमळू लागते. सूर्यप्रकाशाने कातडी करपते. तशी पराश्राव्य ध्वनीने मनुष्यांची कातडी करपू शकते. योग्य प्रमाणात व योग्य पद्धतीने तर पराश्राव्य ध्वनी मनुष्याच्या आरोग्य साधनेला उपयोगी पडणारा आहे. आधुनिक काळात इंजेक्शनची सुई देहात भोसकण्याची आवश्यकता राहणार नाही. त्वचेला छिद्रे असतातच. पराश्राव्याच्या सहाय्याने त्वचेच्या या छिद्रांतूनच औषधे शरीरात सोडता येतील. अशा प्रकारची पराश्राव्याची इंजेक्शनची सुई तयार झालेली आहे.

धोब्याच्या लॉन्ड्रीच्या व्यवसायात विशेषतः लोकरीचे आणि रेशमी मौल्यवान कपडे 'पराश्राव्याने' उत्तम-प्रकारे धुता येतात. त्यासाठी साबण, सोडा किंवा पेट्रोल इत्यादि पदार्थांचीसुद्धा आवश्यकता लागत नाही. दंतवैद्याना दात कोरण्याचे कष्टाचे काम यापुढे पराश्राव्य यंत्रामुळे फारच हलके व सुखाचे होणार आहे. दातांची खोदणी करताना त्यामुळे वेदना होणार नाहीतच, पण कामही सुरळ आणि झटपट होईल. 'क्ष' किरणांचा मेंदूची तपासणी करण्यासाठी उपयोग करणे फार कठीण असते. मेंदूची तपासणी करण्यासाठी पराश्राव्य ध्वनीचा उपयोग तर कल्पनेबाहेर उत्तमरीतीने होतो.

पृथ्वीच्या पोटात दडलेले खनिज पदार्थ शोधून काढणे, नळ्या व पत्रे यांची जाडी मोजणे, एरवी अदृश्य असणाऱ्या अनेक रासायनिक व भौतिक घटनांचा सुगावा लावणे इत्यादि प्रकारच्या विविध कामांसाठी पराश्राव्याचा उपयोग शास्त्रीयदृष्ट्या सुधारलेल्या देशांत अतिशय मोठ्या प्रमाणात वाढत आहे. सध्या आधुनिक जगात वापरण्यात येत असलेली अनेक प्रकारची यंत्रसामुग्री आगामी काळात पराश्राव्यामुळे मागे पडेल. स्वयंपाक घरातील कामापासून ते प्रचंड कारखान्यातील कामापर्यंत आणि रणक्षेत्रापासून रुग्णालयापर्यंत सर्व जग पराश्राव्य ध्वनीची साधने व्यापून टाकतील.

पी. व्ही. ॲन्ड को. टेलर्स
गणेश बिल्डिंगच्यामागे, नवीपेठ,
जळगाव.
जेन्टस् स्पेशॅलिस्ट
पी. व्ही. ॲन्ड को. टेलर्स
जळगाव.

# डाग....!

—कु. अंजली रामदास कुळकर्णी
P. D. Arts 'A'

तीन फुटी मोठ्या गोदरेजच्या आरशापुढे उभी राहून केतकी आपली मोहक छबी निरखुन पहात होती. आज तिने केसाची एक आकर्षक रचना केली होती. त्यावर मोगरीचा सुंदर गजरा माळला होता. अबोली रंगाची साडी आणि तसलाच ब्लाऊज तिने अंगात घातला होता तिची सडपातळ उंच आणि गोरीपान देहयष्टी खरोखरच त्यात सुंदर दिसत होती. केसातील मोगरीचा मंद सुवास, अंगावर शिंपडलेल्या सेंटचा वास आजूबाजूला भरून राहीला होता सुंदर माणसांच्या आजूबाजूच वातावरण त्यांच्याप्रमाणेच मोहक आकर्षक आणि सुंदर असत की काय न कळे !

आरशातल्या आपल्या मोहक छबीकडे पाहून केतकी खुदकन हसली आणि त्याचबरोबर तिच्या गालावर पडणारी खळी तिच्या सौंदर्याची आणखी एक साक्ष देऊन गेली. हातात लिपस्टिकची कांडी घेऊन ती आपल्या नाजूक हातान ओठावरून फिरवू लागली ...... पण क्षणभर तिचा हात थांबला ... डोळे आरशावर जास्तच रोखले गेले ...... ओठावर किंचित पांढरट डाग पडल्याच तिला जाणवल. पण त्याकडे पाहूनही फारसा विचार न करता पुनः ती ओठावरून ती लालचुटूक कांडी फिरवू लागली. त्या लाल रंगान ओठाचा पांढरटपणा झाला ...... तिला हायस वाटल मनासारखे रूप आरशात दिसल्यावर ती चटकन तेथून दूर झाली.

आपल्या पर्समध्ये 'रोज लिपस्टिक' 'चार्मिंग ग्लो' 'ब्लू आईज' 'ॲट्रॅक्टिव्ह लिप्स' इत्यादि विविध रंगाच्या, विविध नावाच्या आणि तितक्याच आकर्षक बाटल्या ती बॅगमध्ये भरू लागली. केतकी देसाई ही 'ब्युटेक्स' कंपनीची रिप्रेझेंटेटिव्ह होती. सडपातळ गोरापान रंग. लांब केस. टपोरे डोळे आणि आकर्षक व्यक्तिमत्व ह्यामुळे पंचवीसजणींतुन तिची कंपनीची रिप्रेझेंटेटिव्ह म्हणून निवड करण्यात आली होती कंपनीतर्फे वास्तविकतः तिच्यासारख्या सुंदर मुलीला सौंदर्यप्रसाधने वापरायची काहीच गरज नव्हती पण कंपनीच्या नियमाप्रमाणे वागणे तिला आवश्यक होते. नाहीतर इतक्या विविध सौंदर्य प्रसाधनांनी तिला खुलवायची गरजच नव्हती. मूळात सुंदर असलेल्या वस्तुला इतर वस्तूंनी खुलवायची गरजच नसते ! त्यातीलच केतकी ! पण कंपनीच्या नियमांना मोडून चालणार नव्हत.

भराभरा बॅगमध्ये सौंदर्यप्रसाधने भरून तिने बॅग उचलली. आज तिला कंपनीची एक मोठी ऑफर पूर्ण करावयाची होती. केतकी आल्यापासून कंपनीला बऱ्याच ऑर्डर्स मिळत होत्या... एकूण कंपनीची चलती होती. सॅंडल पायात चढवुन ती झटपट बाहेर पडली आणि ब्लॉकला कुलुप लावून आपल्याच नादात किल्लीशी चाळा करीत मेनरोडवर आली.

आज सकाळपासून केतकीची धावपळ चालू होती. बरीचशी कामे आटोपायची होती. आणि त्यातुन निलेशच आग्रहाच पार्टीच आमंत्रण होत ! त्याच्या कंपनीतील फर्नांडिस; मेरी टेर, नंदा शारंगपाणी, वासंती केळकर त्याशिवाय त्याच्या कंपनीचे डायरेक्टर जॉन विंस्टेन, सारेच येणार होते... त्यातून आपल्या भावी पत्नीची... केतकीची ओळख सर्वांशी करून द्यायची कोण घाई झाली होती त्याला ! निलेश स्वतः रुबाबदार, आकर्षक होता शिवाय कंपनीचा मॅनेजर होता... स्वतंत्र गाडी... हजार-बाराशे रुपये पगार... बंगला ! साराच श्रीमंती थाट होता. केतकी आणि निलेश दिवाळीनंतर विवाहित होणार होते पण त्याआधी तिची ओळख सर्वांशी करून देण्यासाठीच तर त्याने आज ही खास पार्टी अरेंज केली होती. केतकीचे साहेब... मिस्टर नायडूंनीच निलेशची तिच्याशी ओळख करून दिलेली होती आणि तेव्हापासून तिच्या रूपाला भुललेला निलेश तिच्याभोवती सतत रुंजी घालत असायचा... आता तर त्यांचा विवाह निश्चित झाला होता....



तिने लांबसडक केसांची एक वेणी घातली होती. त्यावर आकर्षक पद्धतीने गजरा माळला होता. 'साडी कोणती नेसावी ?... तिने खाडकन कपाट उघडल... आतल्या इन्द्रधनुष्याकडे एक नजर टाकली... ती निळ्या रंगाची .. अंहं ! मग ती स्लेट कलरची... नकोच ! ती लाल गडद फुलांची छे छे ! ती फेंट पिवळ्या रंगाची आणि त्यावर असलेल्या सोनेरी प्रिंटची हं ! काय खुश होईल तो ! आपण त्यानच घेऊन दिलेली साडी नेसलो तर !' तिने खुश होऊन ती साडी बाहेर काढली आणि हातानच टाळी वाजविली.

साडी नेसून झाल्यावर तिने पुन्हा आरशात पाहिल आणि तिच लक्ष आपल्या ओठाकडे गेल... छे ! छे ! डाग सारखा वाढतोय... लिपस्टिकनेसुद्धा छपत नाही आता ! तरीसुद्धा आपण जास्तीत जास्त कंपनीची सौन्दर्यप्रसाधने वापरत नाही मग... हा डाग ! डाग छपवायला लिपस्टिक वापरायलाच हव होत आणि उद्याच डॉक्टरकडेसुद्धा जायला हव होत ! पण निलेशच्या लक्षात आल तर.. ! बापरे !' ही कल्पनाच तिला सहन होण्यासारखी नव्हती. अगदी इमिजिभेटली काही तरी उपाय करायलाच हवा होता. आपल्या गोऱ्यापान अंगकांतीवर हे... डाग...! छे. असं होणार नाही. केतकीसारख्या नाजूक केतकीला आपल्या समोरच्या आरशात डागाने ठिकठिकाणी डागाळलेल शरीर दिसत होत ! कुरूप ...... सुकलेली केतकी आरशात दिसत होती ! केवळ कल्पनेनच ती घाबरली. एक अस्फुट उद्‌गार तिच्या तोंडून बाहेर पडला. कपाळावर जमलेले थेंब तिने हळूच पुसले आणि त्या सहाय्य कल्पनेला डावलून तिने स्वतःला सावरल तरी आपण नायडूंचा सल्ला घेतला होता. काय म्हणणार ते "मिस केतकी, तुम्ही सौंदर्य-प्रसाधने सुरू केलीच पाहिजेत नाहीतर आमच कस होणार ! अहो ! तुम्हीच पहा, तुम्हीच जर ती वापरली नाहीत तर आमचा खप कसा होणार ? आणि त्यातील आकर्षकपणा तरी लोकांना कसा पटणार ? आणि सौन्दर्यप्रसाधनांचा वापर वाढल्याशिवाय कंपनीचा खप कसा वाढणार ! खर ना ! मी म्हणतोय ते. म्हणून तर माझ्या मताने तुम्ही ती वापरलीच पाहिजेत. "you must keep it" ह्या साखर पेरलेल्या बोलण्यावर केतकी शब्दसुद्धा बोलू शकली नाही. पर डाग वाढत असल्यान लिपस्टिक वापरणच भाग होत'

तिने लिपस्टिक काढली आणि ओठावरून फिरवायला सुरवात केली पण... आज प्रयत्न करूनही डाग छपत नव्हता. ती त्रासली .. रागावली. पण व्यर्थ ! पुनः दाटथर ओठावर बसविण्याचा ती प्रयत्न करू लागली. डाग पुष्कळसा छपताच ती मनातून खुलली आणि आणखी डाग छपविण्याचा प्रयत्न करू लागली. ओठावरचा डाग दिसेनासा होताच तिला हायस वाटल ! आणि 'उद्या डॉक्टरकडे जायलाच हव अगदी इमिजिभेट' असा विचार करीत ती निलेशची वाट पहात दारात उभी राहीली.

* * *

ब्ल्यू हेवन मधील पार्टी अगदी रंगली होती. आत काटेचमचे आणि ग्लासेसमध्ये बुडलेल्या लोकांना बाहेर धुव्वाधार पाऊस पडत आहे त्याची शुद्ध कशी असणार ! पण, बाहेर मात्र पावसाने थैमान घातल होत ! सरीवर सरी कोसळत होत्या ...... आकाशात काळ्याकुट्ट मेघांनी गर्दी केली होती. आत पार्टी अगदी रंगात आली होती. हास्यविनोदाचे फवारे उडत होते. मध्येच फर्नांडिस निलेशला "घरी जाताना तुझी गाडी घेऊन जातो आणि लागलीच शोफरच्या हाती पाठवून देतो" असे सांगुन गाडीची चावी घेऊन गेला.

१२-१२॥ वाजले ...... वातावरणातील धुंदी हळूहळू नाहीशी होऊ लागली ...... डोळे झोपेने पेंगळू लागले ..... सर्वजण खाली पोर्चमध्ये आले आणि भराभरा गाड्या घेऊन निघूनही गेले. केतकी आणि निलेशने गाडीचा बराच वेळ वाट पाहीली. पण गाडीचा पत्ताच नव्हता ! त्यातून पावसाचा धुमाकूळ चालला होता. पाऊस थांबण्याचे चिन्हच दिसेना. बराच वेळ गाडीची वाट पाहूनहि गाडी आली नाही. तेव्हा निलेशने टॅक्सी पाहण्यास सुरवात केली. पण टॅक्सीही दिसेना ... शेवटी निलेश चिडला ...... मनातल्या मनात फर्नांडिसला दोनचार अपशब्द बोलून तो तिला फ्लॅटवर पोचवायला भर पावसात निघाला. तसा केतकीचा फ्लॅट फारसा लांब

नव्हता. पण बाहेर गारठा वाढतच चालला होता. बप्बप् पाऊल टाकीत टाकीत दोघेही आ ऽ वासून बसलेल्या शांत आणि काळपाकुट्ट रस्त्यावरून जाऊ लागले.

*  *  *

फ्लॅटमध्ये पोचताच केतकीने निलेशला पाऊस थांबेपर्यंत बसण्यास सांगितले; ती स्वतः कपडे बदलून आली. नॅपकिनने खसखसून तोंड पुसू लागली. आणि कॉफी करण्यासाठी वळली. आपल्याच नादात ती वावरत होती. पण निलेश तिच्या हालचाली निरखित होता. त्याच लक्ष एकदम तिच्या चेहऱ्याकडे गेल .. आणि ओठावरचा पांढरट डाग पाहून तो चमकला... एकदम चक्कर आल्यासारख वाटल त्याला! इतका वेळ आपल्या डागाच दुःख विसरलेल्या केतकीला त्याच निरखून पाहण कसकसच वाटल... ती चपापली .. सुंदर, नितळ चंन्द्रावरसुद्धा डाग असतो हे ह्याला उमजल तर... ती कावरीबावरी झाली. झटकन मान फिरवून कॉफीचे कप भरू लागली. कशी तरी थरथरत्या हातान तिन त्याला कॉफी दिली. बाहेरच्या गारव्याने गारठलेल्या निलेश आणखीनच गारठला होता. एका घोटात कॉफीचा कप रिकामा करून तो तात्काळ बाहेर पडला. केतकीला त्याच्या वागण्यान वाईट वाटल. आणि लगलीच डोळ्यात आसवांनी गर्दी केली. उशीत डोक खुपसून तिन अगदी मनसोक्त रडून घेतल रात्रभर...!

*  *  *

दुसऱ्याच दिवशी ती डॉक्टर रंगनाथाकडे गेली. डॉक्टरांनी केस पाहिली. उत्कृष्ट औषधे लिहून दिली आणि औषधाच्या प्रिस्क्रिप्शनबरोबर 'सौन्दर्यप्रसाधने वापरण बंद करा' हा सल्लासुद्धा दिला. त्यांच्या मताने हा त्याचाच इफेक्ट आहे अशी पूर्ण खात्री होती. दिलेली औषध घेऊन केतकी घरी आली आणि तात्काळ नायडूंच्याकडे रजेचा अर्ज पाठविला.

रोज ती निलेशची वाट पहात असे... पण त्याचा पत्ताच नव्हता... ती चिडली. मनातून तिला फार वाईट वाटल, पण पुन्हा त्यान जी प्रतिक्रिया दाखविली ती योग्यच होय असा विचार तिच्या मनात आला. आजची मूर्तिमंत सौन्दर्यदेवता उद्या 'कुरूपपत्नी' म्हणून संबोधली गेलेली कोणाला आवडेल? ऽऽ छे ऽ छ! आपण नक्कीच बऱ्या होणार आहोत... आपण निश्चितपणे कुरूप होणार नाहीत. नक्कीच नाही.... पुन्हा एकदा दुःखाची उमळ तिला आली आणि तिचे टपोरे डोळे आसवांनी डबडबले.

१५ दिवस गेले पण, निलेश एकदाही आला नाही. नाहीतरी डाग पूर्ण जाईपर्यन्त त्याला भेटायच नाही असं तिन ठरविलच होत. हळूहळू डाग नाहीसा होऊ लागला होता. कातडीला पुन्हा पूर्वीसारखा रंग येऊ लागला होता. तिच्या आशेला पालवी फुटत होती. नाहीतरी आशादायी चिन्हाव्यतिरिक्त मनुष्य आशेला आपल्या हृदयात विस्तारूच देत नाही! डाग जवळजवळ नाहीसा होत आला होता. वाळलेल्या, सुकलेल्या केतकीच्या चेहऱ्यावर पुन्हा टवटवी येऊ लागली होती.

*  *  *

आज पुन्हा ती त्या दिवसासारखीच नटणार होती... पण फक्त सौन्दर्यप्रसाधन न वापरता! खऱ्या रूपाला आज ती खुलविणार होती. मोठ्या आनंदी उत्साही मनाने ती आरशापुढे उभी होती. ओठावरला डाग पूर्णपणे नष्ट झाला होता. आज खरोखरच ती आकर्षक वाटत होती... तिच्या मूळच्या सौन्दर्याला तोडच नव्हती म्हणा! ती मनाशीच खुदकन हसली आणि बॅग उचलून चालू लागली.

आज तिला नुसत निलेशलाच भेटायच नव्हत तर नायडूंना त्यांच्या कंपनीच्या सौन्दर्यप्रसाधनांचा इफेक्ट सांगून तात्काळ राजीनामासुद्धा ठेवायचा होता त्यांच्या पुढे! पण ह्या साऱ्या कृतीने निलेश खुश होणार आणि 'सौन्दर्यप्रसाधन वापरू नकोस' असा सूज्ञपणे उपदेश करणार हे सुद्धा ती जाणून होती. आज ती विलक्षण आनंदी दिसत होती. एका हिंदी गाण्याच्या ओळी पुटपुटतच तो हातातली चावी फिरवत मोठ्या उत्साहाने निलेशला भेटायला जात होती. आपल्याच नादात!



थोडफार अंतर जात नाही तोच गाडीचा हॉर्न ऐकून ती भानावर आली. तिन दचकून पाहिल तो गाडीतून निलेश आणि एक स्त्री बाहेर पडली. तिन त्या स्त्रीला ओळखल ...... कोण बर! हं निलेशच्या कंपनीतलीच वासंती केळकर- हो तीच?

निलेशने हसतच वासंतीकडे पाहिल आणि केतकी-कडे वळून "अग! केतकी, आम्ही तुझ्याकडेच निघालो होतो म्हटल हिची 'नवी' ओळख करून देऊ!" त्याच्या बोलण्यावर वासंतीने स्मितहास्य केले आणि ती केतकीकड निरखून पाहू लागली. क्षणभर केतकी भांबावली पण पुनः सावरून "मग चला ना!" म्हणाली, "अंह! आता इथेच ओळख करून देतो. ह्या पूर्वीच्या वासंती केळकर आणि आताच्या मिसेस निलेश बर का! आणि ह्या 'मिस केतकी देसाई ...!' पण त्याचे हे पुढचे शब्द ऐकायला केतकी भानावरच नव्हती ... तिला कसकसच वाटल ... अंगावर काटा उभा राहीला. ... डोळ्यापुढे अंधार आला आणि डोक गच्च दाबून तिन एक अस्फुट उद्गार काढला ... तिची गोरीपान देहयष्टी थरारली आणि ती धाडकन खाली कोसळली ... पुढच तिला काही कळलच नाही ... दिसत होता फक्त भविष्याचा मिट्ट काळोख!

*  *  *

---

# उत्तम विद्यार्थी--निरुपण

उत्तम कपडे लेणे । अर्धा डझन नग भक्ती घेणे ।
पोरी न्याहळीत हिंडणे । गार्डनवरी ॥
'वारकरी पंथाची' कास धरणे । ए. टी. के. टी. चा काम घेणे ।
सदा गाईडा भजणे । पुरुषार्थ ॥
लेक्चर्सना जात राहणे । परंतु 'बाल्कनी' मध्ये बसणे ।
दुसऱ्याचा रोल देणे । पुण्यकर्म ॥
गणित स्वतः सोडवणे । जर्नले मनाने लिहिणे ।
मनोभावे नोटस् काढणे । हे होणे नाही ॥
वर्ग, ग्रंथागर, सभागार । सारे पापाचे आगर ।
चार हात दूर राहावे । त्याजपासूनी ॥
होस्टेली वास्तव्य असावे । 'ज्ञान' मर्दन करीत रहावे ।
सिनेमा शतक पुरे करावे । निष्ठेने ॥
ज्ञान, व्यासंग – खोल । सारे फुकाचे बोल ।
गुरु – मैत्री, क्लास, गाईड । त्रिसूत्री यशाची ॥
जो अशा गुणे शोभला । बी. एस्. सी. पदवी लाविता झाला ।
पेशाची ग्रॅज्युएटला । म्हणती पुरुषोत्तम ॥

—रमेश टी. काळे
F. Y. B. Sc. 'A'

# चंद्रप्रवास.... !

—श्रीधर चौधरी
F. Y. B. Sc. 'A'

चंद्राविषयी मानवाने फार काळापासून अनेक कल्पना केलेल्या आहेत. हिंदू धर्मात आणि मुसलमान धर्मात तर त्याला मोठे स्थान मिळाले आहे. आणि कवींनी तर त्याच्याविषयीच्या कल्पनांचा मोठा पर्वतच रचून ठेवला आहे. परंतु खगोलशास्त्रज्ञाने चंद्राचे हे महत्वाचे स्थान एकदम खाली आणून चंद्र हा पृथ्वीभोवती फिरणारा एक उपग्रह आहे हे सिद्ध केले

चंद्राचा व्यास २१६० मैल असून तो पृथ्वीपासून सुमारे अडीच लक्ष मैलावरून पृथ्वीला प्रदक्षिणा घालतो. पृथ्वीभोवती फिरताना तो वर्तुळाकार न फिरता लंब-वर्तुळाकार कक्षेतून फिरतो. त्याचप्रमाणे चंद्र स्वतःभोवती फेऱ्या मारीत असतो. व त्यावेळी तो स्वतःच्या आसा-भोवती कललेला असतो. ह्या सर्व गोष्टींमुळे पृथ्वीवरून चंद्राचा चार सप्तमांश भाग फक्त आपणाला दिसतो. व तीन सप्तमांश भाग नेहमी अंधारात दडलेला असतो. अपोलो ११ हे यान ज्या शांतिसागरात उतरले तो शांति-सागराचा भाग या चार सप्तमांश भागात व अपोलो १२ उतरले तो भाग तीन सप्तमांश भागात येतो.

चंद्रप्रवास करिता खरी तयारी १९६१ सालापासून सुरु झाली. त्यावेळी प्रथमच अमेरिकेचे भूतपूर्व अध्यक्ष जॉन केनडी ह्यांनी ह्या दशकात मानव चंद्रावर पोहोचला पाहिजे व तोही अमेरिकन मानव सर्वात आधी पोहोचायला हवा असे घोषित केले. आणि खरोखरच त्यांची घोषणा अपोलो ११ ने पूर्ण करुन दाखविली.

अपोलो ११ हे यान चंद्रावर उतरले, त्याची खरी रंगीत तालीम १० ने प्रथम करून दाखविली. अपोलो १० ची तालीम जेव्हा तंतोतंत पार पडली; त्यावेळी जगातील मानवजातीमध्ये एकप्रकारे कुतूहल निर्माण झाले. मानव चंद्रावर कधी पाऊल ठेवील असे त्यांना झाले होते ! २० मे १९६९ रोजी अपोलो ११ ची चाचणी घेण्यात आली. त्याचे व्हॉल्व, स्वीच व संरक्षणात्मक यंत्रणा कसून तपासणी घेण्यात आली होती. चंद्रावर गेल्य[...] काय काय गोष्टी करावयाच्या त्यासाठी नील आर्म[...] व एडवीन ऑल्ड्रिन यांना ट्रेनिंग देण्यात आले त्यासाठी त्यांना तेथे करावयाच्या कामाचा भरपूर [...] करावा लागला. एवढी तयारी करून अपोलो ११ हे तीन यात्री नील आर्मस्ट्रॉंग, एडवीन ऑल्ड्रिन व कॉ[...] यांच्यासह १६ जुलै १९६९ रोजी अ[...] उड्डाणास सज्ज झाले होते.

दिनांक १६ जुलै १९६९ रोजी सकाळी [...] २ मि व भारतीय वेळेप्रमाणे ७ वा. २ मिनि[...] ३२४२ टन वजनाच्या अपोलो ११ ने केपकेनेडी [...] यशस्वी उड्डाण केले. उड्डाणानंतर १२ व्या मिनि[...] अपोलो ११ दुसऱ्या अवस्थेत पृथ्वीच्या कक्षेत [...] परिभ्रमण करू लागले. तिसऱ्या टप्प्यात सर्टन [...] ज्याने उड्डाण करून अपोलो ११ ला गती प्राप्त [...] दिली, त्याचा त्याग करण्यात आला. नंतर १७ तार[...] दिवस आरामात घालवून दि. १८ रोजी रात्री ऑ[...] व आर्मस्ट्रॉंग यांनी 'ईगल' या यानाची [...] घेतली. मुख्य यान 'कोलंबिया' मधून 'ईगल' चांद्रयानात जाण्याचा मार्ग अवघा ३२ इंच प[...] होता. दि. १९ रोजी चंद्रकक्षेत जाण्यासाठी अ[...] उडवू। कोलंबियाचा वेग कमी करण्यात आला. थोड्याच वेळाने कोलंबियाने चंद्रकक्षेत प्रवेश केला.

ज्या अभूतपूर्व घटनेकडे सर्व जगाचे लक्ष ला[...] होते. ती घटना रविवारी मध्यरात्री नंतर म्हणजे सोम[...] १ वा ४७ मिनिटांनी चंद्रावर घडली त्यावेळी अ[...] ११ पासून झालेले 'ईगल' हे चांद्रयान नील आर्म[...] व ऑल्ड्रिन यांच्यासह चंद्राच्या विषुववृत्ताजवळील 'श[...] सागर' नावाच्या प्रदेशात अलगद उतरले. 'ईग[...] उतरल्यानंतर भारतीय वेळेप्रमाणे ८ वा. ९ मिनि[...] चंद्रप्रवाशांपैकी यानाचे दार उघडून नील आर्मस्ट्रॉंग [...]



चंद्रावर पहिले पाऊल ठेवले. तेथे त्यांनी चंद्रावरील वस्तू गोळा करण्यासाठी प्लॅस्टिकच्या पिशव्या, यांत्रिक चिमटे दोन टेलीव्हिजन कॅमेरे, चंद्रकंप टिपणारे यंत्र (सीस्मामीटर), लेसर किरण परावर्तित करणारा आरसा; विशिष्ट लेप असलेली प्लॅस्टिकची फिल्म इ. अनेक सामुग्री होती. त्याचप्रमाणे नील आर्मस्ट्रॉंग यांच्याजवळ चंद्रावर ठेवण्या-साठी १) ॲल्युमिनियम, चांदी, लोखंड या धातूपासून बनविलेले एक पदक- या पदकावर पृथ्वीच्या दोन गोलांचे चित्र व त्याखाली तीन अंतराळ वीरांची व अमेरिकेचे अध्यक्ष निक्सन ह्यांची सही होती. २) सेल्युलाईडच्या पट्टीवर कोरलेले ( मायक्रो फिल्म केलेले ) पृथ्वीवरील सर्व राष्ट्रप्रमुखांचे संदेश. ३ ) अमेरिकेचा तेथे फडकत ठेवण्यात येणारा राष्ट्रध्वज व इतर १३६ राज्यांचे पुन्हा परत आणण्यात आलेले राष्ट्रध्वज ४ ) युरी गागारीन व व्लादीमिर कॉमोराव या मृत 'रशियन अन्तराळ वीरांची, पदके तेथे नेऊन परत आणण्यात आली. नील आर्मस्ट्रॉंग हे चन्द्रावर जवळ जवळ २ तास ५५ मिनीटे व ऑल्ड्रिन १ तास ५४ मिनिटेपर्यंत होते

तेथे लेसरकिरण परावर्तित करणारा आरसा उभा केला. चन्द्रावर लेसरकिरण सोडून ते पृथ्वीवर परत येण्यास किती वेळ लागतो, हे पाहून चन्द्राच्या हालचालीविषयी अचूक मोजमाप घेता येईल व पृथ्वी ते चंद्र हे अंतर इंचाइंचापर्यंत अचूक मोजमाप घेता येतील व तसेच चंद्र पृथ्वीपासून दूर चालला आहे का हेही ठरविता येईल. आरसा उभा केल्यानंतर थोड्याच वेळात कॅलिफोर्नियातील एका वेधशाळेने त्यावरून परावर्तित झालेले किरण पृथ्वीवर आल्याचे कळविले. एवढ्या गोष्टी करून झाल्यावर व तेथील दगड व मातीचे नमुने गोळा करून दोघे यात्री यानात शिरून त्यांनी दरवाजा घट्ट बंद करून घेतला.

त्याच दिवशी दि. २१ रोजी पृथ्वीकडे परतण्यास रात्री ११ वाजून २३ मिनिटांनी 'ईगल्ने' चन्द्रावरून उड्डाण केले व मध्यरात्रीनंतर ३ वाजून ७ मिनिटांनंतर त्याची कोलंबियाशी युती झाली. या दोन्ही यानांची युती झाल्यानंतर दोघे यात्री परत कोलंबियात येऊन, नंतर 'ईगल' या यानाला सोडून देण्यात आले. त्याचप्रमाणे सुफ्कारी कोलंबिया या मुख्य यानापासून सर्विस मोडयुल अलग करण्यात आले व नंतर ते वातावरणातच नष्ट होऊन थोड्याच वेळाने कोलंबियाने पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश केला. पुढे ते पॅरॅशूटच्या साहाय्याने प्रशांत सागरात उतरले. व नंतर त्या तिघा यात्रींना विमानाच्या साहाय्याने यु[...]वर उचलून घेण्यात आले.

त्याचप्रमाणे १६ नोव्हेंबर १९६९ रोजी पाठविण्यात आलेल्या अपोलो १२ ने सुद्धा अपोलो ११ प्रमाणेच कार्य केले. परंतु फरक एवढाच होता की अपोलो ११ ज्या भागात उतरले त्या भागाच्या विरुद्ध भागाला अपोलो १२ उतरले. त्यांना तेथे उतरल्यानंतर जवळच थोड्या अन्तरावर पूर्वी अमेरिकेचे सर्वेअर २ जाऊन आदळलेले यान त्यांच्या दृष्टीस पडले व त्यांनी त्या यानाचे टेलि-व्हिजन कॅमेरे व इतर वस्तू काढून आणल्या.

अपोलो ११ च्या प्रवासामुळे चन्द्रावरील मानवी जीवनाविषयी काही प्रश्न सुटले आहेत. आता मानवाचे पुढील पाऊल म्हणजे, अन्तराळात दळण-वळण सुरु होण्यास एक मोठा कायम स्वरूपाचा तळ निर्माण करण्यात येणार असून त्यावर माणसे राहतील. त्यांचे दैनंदिन जीवन पृथ्वीवरील जीवनाप्रमाणेच राहील. तेथून शास्त्रीय उपकरणांचा वापर करून चंद्र, मंगळ, अंतराळ, व इतर ग्रहाबद्दल माहिती जमा करून ती पृथ्वीवर किंवा चंद्रावर पाठविणे व अशा तऱ्हेने अंतरा-ळात फिरते ठेवलेले स्टेशन पृथ्वी ते चंद्र ह्यातील मधला टप्पा म्हणून वापरण्यात येईल.

चंद्रावर बशीप्रमाणे खोलगट असे मोठ्या व्यासाचे खड्डे आहेत. त्यांना विवरे म्हणतात. चंद्रावर गोलाकार विवरे व त्याच्या भोवताली पर्वतांचे उंच उंच तट अशी हजारो विवरे आहेत. असले सर्वांत मोठे विवर १७० मैल व्यासाचे आहे. या सर्व विवरांत ५० मैल व्यासाची विवरे तर पुष्कळ आहेत. या सर्व विवरांना 'क्रेटर' असे म्हणतात. चंद्रावर क्रेटर्स कसे निर्माण झाले त्या विषयी शास्त्रज्ञांनी वेगवेगळी मते मांडली आहेत. आता-पर्यंत तर मानवाने शांतिसागरावर पहिले पाऊल ठेवले. परंतु त्याच्या पुढील कार्यक्रम सुद्धा आखून ठेवण्यात आलेला आहे. काही शास्त्रज्ञ असे म्हणतात की चंद्राच्या भूगोलाचा अभ्यास केल्यावर एक ना एक दिवस माणसाची

चंद्रावर वस्ती होणार. राहणारा मानव हा चन्द्रावर केबलमध्ये राहील. तथील वस्तीवर खालील गोष्टी असतील.

१ ) अणूभट्टी २ ) खनीजाच्या खाणी ३ ) कच्च्या-मालाचे पक्क्या मालात रूपांतर करणारे कारखाने, द्रवरूप हायड्रोजन, ऑक्सिजन वगैरे निमाण करणारे कारखाने. ४ ) अंतराळ स्टेशन हे पृथ्वी व चंद्राच्या मधले उतरण्याचे ठिकाण असेल. ५ ) चंद्रावर उतरण्यासाठी एखादा तळ. ६ ) दर तासाला माणसांना एका वस्तीवरून दुसऱ्या वस्तीवर नेणारे स्वयंचलित प्लॅटफार्म्स ७ ) घरे व घरामागे करमणुकीसाठी थिएटर्स व क्लब ८ ) विद्यापीठ ९ ) सूर्यतारांगणाचा अभ्यास करणारी वेधशाळा. १० ) संशोधन केंद्र. ११ फुले, फळे भाजीपाला इ. जिन्नस पिकविण्यासाठी, हव्या असलेल्या वातावरणात वाढणारी शेते, पण ह्या सर्व शेताचे वर काचेचे वा प्लॅस्टिकचे घुमट असेल व त्यात हवे ते वातावरण खेळते ठेवण्यात येईल. १२ ) कमी गुरुत्वाकर्षण असल्याकारणाने केवळ दोन पंख पाहून इकडे तिकडे हिंडण्याफिरण्याची व्यवस्था १३ ) आर्टगॅलरी. १४ ) जमिनीखालून काढलेले मार्ग व सर्व मार्गांवर विजेचे दिवे लावून केलेला झगझगाट. १५ ) चन्द्रावरून इकडून तिकडे फिरण्यासाठी ठेवलेल्या बसेस. अशी वस्ती चन्द्रावर होण्यास अजून फार अवकाश लागेल.

---

## आधुनिक शाकुन्तल

शाकुंतल जर गेल्या एकदोन शतकात
घडले असते तर......
दुष्यंत आणि शकुंतलेचं मीलन
कधीच झाले नसते.
कारण —
माशाच्या पोटात सापडलेली हिऱ्याची अंगठी
दुष्यंताला देण्याचा
प्रामाणिक मूर्खपणा
कुणाही कोळ्याने केला नसता.

—हिरालाल चौधरी
P. D. Arts 'A'



## निर्झर

झुळझुळ खळखळ
खळखळ झुळझुळ
निर्झर बाळ धावत येई
कुशीत शिरण्या सृष्टीमातेच्या
हर्षोत्कर्षे कुशीत शिरता
कुशीत घेता निर्झर बाळा
आनंदली ती निसर्गशोभा

ठुमकत ठुमकत
लजत नाचत लाजत मुरडत
कुणी वेलिका कुणी बालीका
उधळित आल्या गंधमोहिनी
रविकिरणांनी न्हाऊ घातले
उधळित सुमने सज्ज जहाल्या
वनलता पंचारती करण्या

रुणझुण छुनछुन
छुनछुन रुणझुण
कुणी बालिका धावत येता
निर्झरसंगे खेळू पाहे
तिला चिडविण्या निर्झर अपुल्या
पुढेची धावे पुढेची धावे
त्यास अडविण्या त्यास खिजविण्या
खडे फेकुनी तरंग बघुनी
मान हरपली सानबालिका

—कु. प्रतिभा कृष्णाजी पाटील
S. Y. B. A.

## आचार्य अत्रे ह्यांच्या पुण्यस्मृतीस अभिवादन



आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा : मुलांचा खो खो विजयी संघ



आमचे कलावंत........



'कावळे' ह्या नाटिकेतील कलावंत.



# कर्म....!

**— रामदास वालजी उर्फ तात्या सिन्नूरकर**

**गी**ता ही मुमुक्षूंना मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. संसारदुःखतप्त जीवांना शांत करणारी हिमगंगा आहे. इंग्लंड, जर्मनी वगैरे पाश्चिमात्य देशांतदेखील या ग्रंथाचे अभ्यासू लोक होऊन गेले. इलीच्या काळात लोकमान्य टिळक, महात्मा गांधी वगैरे सर्व थोरांनी यास 'अप्रातिम ग्रंथ' म्हणून संबोधिले आहे. योगी अरविंदाच्या म्हणण्याप्रमाणे गीता नुसती वाचून किंवा गीतेचे पठण करून फारसे साधणार नाही. प्रत्येक बाबतीत नेहमीच्या साध्या व्यवहारातही व कृतीतदेखील गीतेच्या थोर उपदेशाची साक्ष पटावयास हवी जीवनातील नेहमीचे संबंध गीतेत दिसतात. मागे आपण 'ज्ञान' याबद्दल पाहिले. आता 'कर्म' या विषयी थोडक्यात पहावयाचे आहे.

न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।
कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥ अ. ३।५

कोणी प्राणी, मग तो मानव असो वा इतर, ज्ञानी वा अज्ञानी, क्षणभरही **कर्म केल्याशिवाय राहू शकत नाही.**

"यत् क्रियते तत् कर्म" । सजीव प्राणी कर्म केल्याशिवाय जिवंत राहू शकत नाही. महाबोधवंत झाला तरी त्याला कर्मे केल्याशिवाय कसे जगता येईल ? कर्मयोगी अथवा ज्ञानयोगी, कोणीही असो, त्याला कर्मे चुकत नाहीत. "To be or not to be" हा कर्मयोगाचा सिद्धांतपण गीतेने सोडविला.

सूर्य, चंद्र नक्षत्रे सारखी फिरत आहेत, समुद्राच्या लाटा सारख्या धावत आहेत, कधी मंद कधी झपाट्याने एवढाच फरक. मनुष्याचा श्वासोच्छ्वास कोणत्याही क्षणी बंद पडत नाही. मेल्यावर बंद पडला तरीही ओली माती एका स्थितीत राहात नाही. या जगात क्रिया सातत्याने चालू आहे व राहणार.

"सर्वसंकल्प संन्यासी योगारूढस्तदोच्यते । अ. ६।४

जेव्हा मुमुक्षूचे मन विषयात व कर्मांतही आसक्त होत नाही, कर्मांचे मूळ जे संकल्प त्याचा त्याग करतो, तेव्हा तो योगारूढ झाला असे समजावे. खरा योगारूढ अपरोक्ष ज्ञानी किंवा प्रेमसंचारी भक्तच होऊ शकतो. त्या योग्यांना परमेश्वर स्वरूपाचा साक्षात्कार होतो. त्यामुळे ते ईश्वरचिंतनात रंगतात.

अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः ।
स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः ॥ अ. ६-१

जो कर्मफळाची आशा न करता, कार्य कर्म करतो, तोच खरा संन्यासी व तोच कर्मयोगी होय.

कर्मांचा पूर्णपणे त्याग संभवत नाही. जोपर्यंत ज्ञान झाले नाही तोपर्यंत सकाम कर्मे परंतु शुभ करणे जरूरीचे असते त्याने फळ शुभच मिळते सकाम शुभकर्मे करीत राहिल्याने संस्कार वाढतात सत्पुरुषाशी योग येतो व हळुहळू निष्काम कर्मे आचरायला लागतो. त्यामुळे फार दृढ संस्कार होऊन भूतभजनादि क्रिया झाल्यामुळे जीव शक्तिसंचाररूप ज्ञानाजवळ पोहोचतो व मोक्ष मिळवितो.

फळाच्या उद्देशाने केलेली कर्मे फळे उत्पन्न करतात. त्या कर्मांचेच एक फळ म्हणून मनुष्यदेह मिळतो. त्यात पुन्हा जीव तशीच कर्मे करतो. त्यांनी पुन्हा इतर फळे तयार होतात त्यामुळे पुन्हा मनुष्यदेह मिळतो. पुन्हा जीव तशाच प्रकारची कर्मे करतो. याप्रमाणे हे रहाटगाडगे कधी संपत नाही. कोण्या इच्छेला बळी पडून कोण्या जीवाचा घात केला तर जडत्वादि १३ भेदी नरकनिष्पन्न होतात व त्याचा भोग पण भोगावा लागतो. तशी स्थिती धर्मांकरिता धर्मपूर्वक युद्ध केल्याने होणाऱ्या हिंसेची नाही. नीतिपूर्वक चालवलेल्या संसारातच परधर्मांचे बीज पेरले